रायगड, बुधवार दि. १४ जून २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

काळ नदीतील भराव काढला

पान ३ वर

बैलगाडी होत चालली नामशेष

पान ८ वर

खंडाळा घाटात टँकर पेटला

। खोपोली । संतोषी म्हात्रे ।

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर मंगळवारी (१३ जून) पेट्रोलची वाहतूक करणाऱ्या टँकरला अपघात होऊन भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीची भीषणता इतकी होती की, महामार्गावर सर्वत्र धुरांचे लोण पसरले होते. या घटनेत आता चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या जखमींना तत्काळ नजीकच्या पवना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. एक्सप्रेस वेच्या लोणावळा हद्दीत ही घटना घडली आहे. या घटनेची माहिती पोलिसांना आणि अग्निशामन दलाला देण्यात आले. त्यानंतर युद्धपातळीवर आग विझवण्यात आली. दरम्यान या घटनेमुळे वाहतूक काही काळासाठी खोळंबली होती. अपघातामुळे एक्सप्रेस वे सारखा मोठा रस्ता बंद राहिल्याने सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

चौघे होरपळले

महामार्गावर झालेल्या एका अपघातात मदतकार्यासाठी राज्य पोलीस दल, महामार्ग पोलीस, आयएनएस शिवाजी, अग्निशमन दल अशा सर्व यंत्रणा घटनास्थळी असून आता आग आटोक्यात आली आहे. एका बाजूने वाहतूक पूर्ववत करण्यात आली असून, दुसराही मार्ग लवकरच सुरू होईल. राज्य सरकार स्थितीवर पूर्ण लक्ष ठेवून आहे.

- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

वाहतूक पूर्ववत

या अपघातानंतर दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली. काही काळ एका बाजूची वाहतूक सुरु करण्यात आली होती. परंतु ती पुन्हा बंद केली. साडेपाच तासांनंतर दोन्ही बाजूंची वाहतूक सुरु झाली. टँकरही हटवण्यात आलेला आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, टँकर खूप वेगाने जात होता, तेव्हा अचानक चालकाचा टँकरवरील ताबा सुटल्या आणि टँकर कोसळला. यानंतर टँकरमधील केमिकल बाहेर उडालं आणि आगीचा भडका उडाला.

लोणावळा हद्दीतील कुने गावाच्या ब्रीजवर पेट्रोलने भरलेल्या टँकरची रस्त्याच्या कठड्याला धडक बसली. या अपघातात टँकर पलटी होऊन भीषण आग लागली. या आगीची भीषणता इतकी होती की, हायवेवर धुरांचे लोण पसरले होते. त्याचसोबत टँकरला लागलेल्या या आगीमुळे संपूर्ण पूल आणि त्या खालोखाल असलेला पान ५ वर

रायगडाच्या पायथ्याशी दरड कोसळली

। महाड । वार्ताहर ।

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या चित्तदरवाजामध्ये मंगळवारी (१३ जून) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास दरड कोसळली. यामध्ये किल्ल्यावर गेलेल्या पर्यटकांच्या तीन वाहनांचे अतोनात नुकसान झाले आहे त्याचप्रमाणे येथे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाच्या दुकानाचे देखील नुकसान झाले. वाहनांमधील पर्यटक किल्ल्यावर गेले असल्याने सुदैवाने बचावले आहेत.

दरडीमध्ये भले मोठे दगडदेखील रस्त्यावर आले आहेत. या ठिकाणी लिंबू सरबतचा व्यवसाय करणाऱ्या अमर सावंत यांच्या पान ५ वर

आजचा अग्रलेख
शेंडीला हिसडे

वेधक

दिल्ली परिसरात भूकंपाचे धक्के

नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली आणि परिसरात भूकंपाचे झटके जाणवले आहेत. तसेच शेजारील चार राज्यांमध्येही हे भूकंपाचे झटके जाणवले आहेत. सुमारे २० सेकंदांपर्यंत हे झटके जाणवले. ५.७ रिश्टर स्केलचा हा भूकंप असल्याचं समोर आलं आहे. जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड-दोडापासून आग्नेय दिशेला ३० किमीवर या भूकंपाचे केंद्र होते.

युवकांना नोकरीची नियुक्तीपत्रे

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ७० हजार तरुणांना जॉइनिंग लेटरचे वाटप करण्यात आले. या तरुणांना शासनाच्या विविध खात्यांमध्ये नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. मोदी यांनी आज सकाळी १०:३० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे देशात ४३ ठिकाणी आयोजित रोजगार मेळाव्याअंतर्गत ही जॉइनिंग लेटर वितरित करण्यात आली आहेत. रोजगार मेळा हा केंद्र सरकारचा एक विशेष उपक्रम आहे.

रायगडात बोगस पोलीस भरती प्रकरणी चौघांना अटक

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

गडचिरोली पोलीस भरतीत बोगस प्रकल्पग्रस्त प्रकरण उघडकीस आले होते. रायगड पोलीस भरतीतही चार जणांनी नोकरी लागण्यासाठी बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दिल्याचे समोर आले आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून अटक करण्यात आली आहे. बोगस प्रकरणात अजून काही जणांची नावे समोर येणार आहेत. अलिबाग पोलीस या प्रकरणात अधिक तपास करीत आहेत. या प्रकरणी चारही आरोपींना दि.१७ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

राज्यात पोलीस भरती शासनाने जाहीर केली होती. रायगड पोलीस दलात २७२ जागांसाठी डिसेंबर महिन्यात भरती प्रक्रिया सुरू झाली होती. यासाठी हजारो उमेदवारांनी भरती प्रक्रियेत सहभाग घेतला होता. मैदानी चाचणी, लेखी परीक्षा मध्ये पात्र झालेल्या २७२ जणांची अंतिम यादी पोलीस प्रशासनाने जाहीर केली होती. या भरतीत प्रकल्पग्रस्तांसाठीही जागा असल्याने प्रकल्पग्रस्त उमेदवार भरतीत उतरले होते.

गडचिरोली जिल्ह्यात पोलीस भरतीत बोगस प्रमाणपत्र प्रकरण झाले असून यामध्ये अलिबागमधील पोलीस शिपाई याला अटक झाली होती. त्यामुळे प्रकल्पग्रस्त पात्र उमेदवार यांचे प्रमाणपत्र तपासणीसाठी रायगड पोलिसांनी बीड, पान ५ वर

ऑनलाईन धर्मांतर प्रकरण

आरोपीचे बनावट आधारकार्ड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ऑनलाईन धर्मांतर प्रकरणी ठाणे जिल्ह्यातील शहानवाज खानला त्याच्या भावासमवेत पोलिसांनी अलिबागमधून अटक केली. अलिबागमधील एबी कॉटेजमध्ये त्याने दिल्लीतील रहिवासी असून बनावट अधारकार्ड दाखवून राहत असल्याची माहिती समोर येत आहे. ऑनलाईन गेम मार्फत इस्लाम धर्म कबूल करण्यास भाग पाडणारा शहानवाज याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल होता. गाझियाबाद पोलीस पान ५ वर

रायगडात २०७ ग्रा.पं.ची रणधुमाळी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित व २०२२ मध्ये चुकीची प्रभाग रचना, आरक्षण झाल्यामुळे निवडणूका होऊ शकल्या नाहीत. या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम निवडणूक विभागाने जाहीर केला आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील २०७ ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

ग्रामपंचायत आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १६ जून ते १७ जूलै या कालावधीत होणार आहे. त्यामध्ये १६ जून रोजी आरक्षण सोडत काढण्यासाठी विशेष ग्रामसभेची सुचना देणे. २१ जून रोजी विशेष ग्रामसभा बोलावून, तहसीलदार यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, व सर्वसाधारण महिला आरक्षण सोडत काढणे. २२ जून रोजी आरक्षण सोडतीनंतर प्रभाग निहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे. प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सुचना २३ ते ३० जून या कालावधीत दाखल करणे. ६ जुलै प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे. १२ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी यांचा अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसुचनेस जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे. तसेच १४ जूलै रोजी अंतिम प्रभाग रचनेला व्यापक प्रसिध्दी देणे ही प्रक्रीया पार पडणार आहे.

आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर

अलिबाग : १५, **मुरुड** : १५, **पेण** : ११, **पनवेल** : १७, **उरण** : ३, **कर्जत** : ७, **खालापूर** : २२, **रोहा** : १२, **सुधागड** : १३, **माणगाव** :२६, **तळा** : ६, **महाड** : १९, **पोलादपूर** : २१, **श्रीवर्धन** : ८, **म्हसळा** : ११

रायगड जिल्ह्यातील २५६ इमारती धोकादायक

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पावसाळ्यात दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने पार्श्वभुमीवर रायगड जिल्ह्यातील शहरी भागातल्या धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण पुर्ण झाले असून जिल्ह्यात तब्बल २५६ इमारती धोकादायक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. यापैकी ७३ इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याची बाब समोर आली आहे. ही बाब लक्षात घेऊन धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाश्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होण्याचे आदेश नगर पालिका प्रशासनाने दिले आहेत.

महाड येथे २४ ऑगस्ट २०२० ला इमारत कोसळून १६ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेत ४५ कुटूंबाचे संसार

उघड्यावर आले होते. अतिवृष्टी आणि निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे ही इमारत कोसळली होती. या दुर्घटनेची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने दरवर्षी पावसाळ्या पुर्वी धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले जाते. यानंतर या इमारतींमधील रहिवाश्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होण्याचे निर्देश दिले जातात.

जिल्ह्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींना धोकादायक इमारती आणि धरणांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. या ११ नगरपालिका आणि ५ नगरपंचायती मधील सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. यात जिल्ह्यात १८३ धोकादायक तर ७३ अतिधोकादायक असल्याचे समोर आले आहे. यात उरण, खोपोली, पेण, महाड, अलिबाग येथील धोकायदायक इमारतींची संख्या मोठी आहे. या सर्व इमारतींमधील रहिवाश्यांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५ च्या कलम १९५ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. यानुसार इमारतींमधील रहिवाश्यांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत पान ५ वर

शहर	धोकादायक	अतिधोकादायक
अलिबाग	१७	२५
उरण	५०	२०
कर्जत	८	०
खोपोली	३६	२
पेण	२९	१३
महाड	२३	१३
माथेरान	६	०
मुरुड जंजिरा	७	०
म्हसळा	५	०
रोहा	६	०
तळा	२	०
पोलादपूर	२	०

'राष्ट्रामध्ये मोदी, महाराष्ट्रात शिंदे'

जाहिरातीवरुन धुळवड

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवसेनेकडून (शिंदे गट) राज्यातील काही वृत्तपत्रांमध्ये दिलेल्या जाहिरातीवरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. यापूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात 'देशात नरेंद्र अन् राज्यात देवेंद्र' अशी घोषणा दिली जात होती. पण, शिवसेनेकडून (शिंदे गट) आज वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर देण्यात आलेल्या जाहिरातीवर 'राष्ट्रामध्ये मोदी, महाराष्ट्रात शिंदे' असा मजकूर छापण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सर्व्हेमध्ये सर्वाधिक पसंती असल्याचे आढळून आल्याने भाजपने त्यांना पूर्ण नेतृत्व द्यावे, आणि ते म्हणतील तेवढ्या जागा त्यांच्या पक्षाला द्यावात अशी आमच्या पक्षाची उपसूचना

– आ. जयंत पाटील, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष

दादांनी डिवचले

शिंदे साहेब किंवा हे जाहिरात देणारे इतक्या लवकर कसे काय बाळासाहेब यांना विसरले काय कळलं नाही. अशी टीका अजित पवारांनी केली आहे.

आमचं सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहे. 'हे डबल इंजिन'चं सरकार आहे. केंद्र सरकारकडून महाराष्ट्रातील विकास प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात निधी आणि आर्थिक पाठबळ दिलं जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारच्या काळात मेट्रो, पायाभूत सुविधांचे प्रकल्प बंद होते, ते आम्ही तात्काळ सुरू केले.

– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

राज्य सरकारने दूध दर कपात त्वरित मागे घ्यावी - शेकाप

। सांगोला । वार्ताहर ।

राज्य सरकारने दूध दर कपात त्वरित मागे घ्यावी अशी मागणी शेकाप पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शेकाप शिष्टमंडळाने सरकारकडे केलेली आहे. याबाबतचे निवेदन सांगोला तहसिलदारांना सादर करण्यात आले.यावेळी सरकारने बळीराजाचा अंत: पाहू नका अन्यथा रस्त्यावर उतरू,असा इशारा देण्यात आला.

राज्य सरकारने मागील काही दिवसापासून दुधाचे दर जाणूनबुजून कमी केलेले आहेत. त्याचा फटका महाराष्ट्रासह संपूर्ण

सांगोला विधानसभा मतदारसंघावर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो.आधीच अस्मानी संकटानी बळीराजा पुरता मेटाकुटीला आला आहे. पावसाचा तर पत्ता नाही. विशेषतः सांगोला तालुका डाळिंब बोर बागाने प्रसिद्ध होता. परंतु गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये माझ्या सांगोला तालुक्यातील बळीराजा उध्वस्त झालेला आहे. स्व.आबासाहेबांनी आपले संपूर्ण हयात सांगोला तालुक्यातील शेतकरी कष्टकरी जनतेसाठी खर्ची केली. गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये शेतकऱ्याला कुठल्याही प्रकारची एक दमडीची ही मदत मिळालेली नाही. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली त्यावर आम्ही सातत्याने आवाज उठवला. परंतु कुठल्याही प्रकारचे ठोस मदत माझ्या सांगोला विधानसभा परिक्षेत्रातल्या शेतकरी मायबाप जनतेला मिळालेली नाही. यासाठी सांगोला तहसील कार्यालयाला तहसीलदार यांना शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते असंख्य कार्यकर्त्यांसह निवेदन देण्यात आले आहे..

निवेदनात मायबाप जनतेने डाळिंबाच्याबागाउध्वस्तझाल्यानंतर आपले जीवन जगण्यासाठी कुटुंब चालवण्यासाठी मुला बाळांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधला. दुग्ध व्यवसायाकडे वळला. थोडसं बरं चाललं असताना राज्य सरकारला कुठल्याही शेतकऱ्याचे घेणं देणं नाही आणि अचानक पणे गाईच्या दुधाचे दर ४ रू ने कमी केले. गेल्या तीन महिन्यापासून दुधाला प्रति लिटर पान ५ वर

व्यवसायावर परिणाम

माथेरानचा उन्हाळी पर्यटन हंगाम जेमतेमच

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमधील पर्यटक संख्या रोडावली असून, यावर्षी पर्यटकांचे आगमन कमी झाल्याने त्याचा परिणाम येथील व्यावसायिकांवर झाल्याचे दिसत आहे. वर्षागणिक १० ते १२ लाख पर्यटक माथेरानला भेट देतात.त्यामध्ये एप्रिल आणि मे महिन्याचा उन्हाळी पर्यटन हंगाम हा माथेरानकरांसाठी अतिमहत्वाचा हंगाम आहे. दिवाळी, नाताळ पान ५ वर

मिनिट्रेन मात्र मालामाल

माथेरानला भेट देणाऱ्या पर्यटकांची पहिली पसंद असलेल्या टॉय ट्रेनने यंदाच्या उन्हाळ्यात महसुलाचा विक्रम नोंदवला आहे. मार्च ते मे या तीन महिन्यांत नेरळ ते माथेरान या टॉय ट्रेनला एक कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार मार्च ते मे या कालावधीत पान ५ वर

ई रिक्षाबाबतचा अहवाल न्यायालयात

नेरळ : माथेरान सनियंत्रण समितीचे सचिव कार्यालय असलेल्या रायगड

जिल्हाधिकारी कार्यालयाने माथेरान मधील ई रिक्षेच्या पायलट प्रकल्प बाबत आपला अहवाल न्यायालयाकडे पाठवला आहे. त्या अहवालानुसार माथेरान मध्ये पुन्हा ई रिक्षा सुरु होण्याची जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार सचिन शेजाळ यांनी संकेत दिले आहेत. माथेरानमध्ये पर्यावरणपूरक ई रिक्षाचा पायलट प्रकल्प राबविला गेला होता. त्यानंतर शासनाकडून सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर केला जाणार होता,मात्र गेली दोन महिन्यात सादर केला जात नव्हता. श्रमिक रिक्षा संघटनेच्या याचिकेवर सुनावणी प्रसंगी न्यायालयाने अहवाल सादर करताना कोर्टाने राज्य सरकारला स्पष्ट निर्देश दिले होते. पायलट प्रोजेक्ट्च्या अहवालासोबत पान ५ वर

पहिल्याच पावसात बेलोशी - वावे रस्ता पाण्यात

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग - बेलोशी रस्त्यावर लाखो रुपये खर्च करून सार्वजनिक बांधकाम विभागाने डांबरीकरण केले होते. परंतू या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहे. पहिल्याच पावसात हा रस्ता पाण्यात गेल्याचे चित्र समोर आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचा फटका या मार्गावरील प्रवाशांसह पादचाऱ्यांना बसण्याची शक्यता आहे.

अलिबाग - बेलोशी रस्त्यावर खड्डे पडले असल्याने पावसाळ्यात वाहन चालकांना प्रचंड त्रास झाला होता. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वर्षभरापुर्वी राज्य शासनाच्या अर्थ संकल्पातून २५ लाख रुपये मंजूर करून या रस्त्याचे डांबरीकरण केले होते. रस्ता चांगला झाल्याने प्रवासी वर्गाकडून समाधान व्यक्त करण्यात आले. मात्र नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे काही महिन्यातच सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार समोर आला. रस्त्याच्या काही भागात खड्डे पडले. सोमवारपासून अलिबागमध्ये पावसाने काही प्रमाणात सुरुवात केली. या रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साचले असून बेलोशी हायस्कूल समोरील या मुख्य रस्त्याला तळ्याचे स्वरुप आले आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना तारेवरची कसरत करण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या कारभाराबाबत नाराजीचे सुर उमटले जात आहे.

अलिबाग तालुक्यातील बेलोशी-वावे रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची पाहणी करून तात्काळ खड्डे बूजविण्याचे काम केले जाईल. पावसाळ्यात नागरिकांचा प्रवास चांगला व्हावा यासाठी प्रयत्न केले जाईल.
- राजेंद्र डोंगरे
उपअभियंता

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ जून

१) श्रीम. शुभांगी दत्तात्रेय नाईक
वरसोली, अलिबाग,
१४ जून १९४३

काळभोर यांची बदली

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर यांची पुणे येथील बीज परीक्षण प्रयोगशाळेत बीज परीक्षण अधिकारी म्हणून बदली झाली आहे. दत्तात्रय काळभोर कृषी विभागात गेली नऊ वर्षापासून कार्यरत आहेत. सुरुवातीला कोल्हापूर येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात तंत्र अधिकारी, त्यानंतर तालुका कृषी अधिकारी म्हणून सेवा केली असून अलिबागमधील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालायत उपसंचालक म्हणून गेली तीन वर्षे सेवा केली आहे. तीन वर्षाच्या सेवेनंतर त्यांची पुणे जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे.

दत्तात्रय काळभोर यांनी या तीन वर्षात कृषी विभागाच्या वेगवेगळ्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले आहे.

विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील १ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व जिल्हापरिषद व खासगी अनुदानित शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना १५ जून २०२३ रोजी शाळा चालू होण्याच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके हाती पडणार आहेत. त्याच बरोबर गणवेश ही त्याच दिवशी देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तळा तालुक्यासाठी मोफत पाठ्यपुस्तके इ. १ ली ते इ. ८ वीच्या सर्व जिल्हापरिषद व खासगी अनुदानित शाळांसाठी एकूण १०९४० प्रती सर्व माध्यम प्राप्त झाली असून शाळेच्या पहिल्याच दिवशी वाटप करण्यात येणार आहेत. तसेच तालुक्यातील शैक्षणिक वर्ष सन २०२३ २०२४ साठी सर्व मुली ९१२, अनु. जमाती मुले २९६, अनु.जाती मुले ६६, बीपीएल मुले ४३५ असे एकूण १७०९ लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश प्रती गणवेश ३०० रूपये प्रमाणे एक गणवेश विद्यार्थ्यांना १५ जून रोजी शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी वाटप करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

महावितरणचे आवाहन

। कल्याण । प्रतिनिधी ।

वादळी व संततधार पाऊस किंवा अतिवृष्टी, पूर परिस्थिती, झाडे व फांद्या कोसळल्याने तुटलेल्या वीजतारा, विजेची उपकरणे किंवा यंत्रणेमधील शॉर्टसर्कीट आदींमुळे वीज अपघाताची शक्यता असते. या पार्श्वभूमिवर नागरिकांनी सार्वजनिक व घरगुती वीजयंत्रणा, उपकरणांपासून सतर्क राहावे. तसेच पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती, धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्रांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात येतो. अशा स्थितीत वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. वीज ग्राहकांसाठी महावितरणचे मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ हे टोल फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहेत. यासह मोबाईल ॲप, www.mahadiscom.in या वेबसाईटद्वारेही तक्रारी स्विकारल्या जातात. वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार करण्यासाठी महावितरणकडे नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस् कॉल दिल्यास किंवा मोबाईल क्रमांकावरून NO POWER spaceConsumerNumber हा 'एसएमएस' महावितरणच्या ९९३०३९९३०३ या मोबाईल क्रमांकावर पाठविल्यास तक्रार नोंदविली जाईल.

कुडपण पर्यटन विकासासाठी दीड कोटी

पोलादपूर : तालुक्यातील विविध पर्यटनविषयक क्षेत्रांचा विकास करण्यासोबत स्थानिकांना त्या-त्या ठिकाणी रोजगार मिळवून देण्यासाठी शिवसेना भाजपा युतीसरकारच्या माध्यमातून आपण प्रयत्नशील असून कुडपणसारख्या दूर्गम आणि प्रतिमहाबळेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रिटीशकालीन हिलस्टेशनचा पर्यटन विकास करण्यासाठी तब्बल १ कोटी ६० लाखांची तरतूद केली आहे, अशी ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी कुडपण येथे दिली. याप्रसंगी आ.गोगावले यांच्याहस्ते विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे कुडपणवासियांचे मन जिंकण्यात आ.गोगावले यशस्वी झाल्याची चर्चा यावेळी दिसून आली. याप्रसंगी मधले कुडपण येथे झालेल्या सभेप्रसंगी आ.गोगावले यांच्यासमवेत माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, कृउबा समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, प्रभाकर पवार, जावजीबुवा, वसंत शेलार, उपतालुकाप्रमुख सतीश शिंदे, अविनाश शिंदे तसेच विजयबुवा आदी शिवसैनिक तसेच स्थानिक व मुंबईस्थित कुडपणकर उपस्थित होते.

■ माणगाव नगरपंचायतीचे वरीष्ठ लिपिक रामदास पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पत्रकार सलीम शेख, मजीद हाजीते, कमलाकर होवाळ, आजेश नाडकर दिसत आहेत.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे,ढवर ता. अलिबाग, येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्री.अशोक त्रिंबक नाईक रा.नवेदर बेली, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची असून, सदरील जमीन मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे. सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विकीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या वहिवाटिचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिध्द झाल्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार
ढवर, ता.अलिबाग जि.रायगड	३०८	०-११-६० पो.ख ०-००-५० एकूण ०-१२-१०	३.००

अलिबाग
दिनांक: १३/०६/२०२३

(ॲड.वैभव वसंत पाटील)
रा.नवेदर बेली,ता.अलिबाग
जि.रायगड, मो. ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. शिरीष जनार्दन म्हात्रे, वगैरे राहणार नागांव, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची आहे. सदरील शेतजमिन सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आायाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे आिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. शिरीष जनार्दन म्हात्रे, वगैरे यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकर्तीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १०(दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे आिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	गट नं.	हि.नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
सुरई, ता.अलिबाग.	५	०	०-२८-२० ०-०३-०० पो.ख. ०-३१-२० एकूण	७-०६

अलिबाग,
दिनांक : १३/०६/२०२३.

सही/
(ॲड. संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

ग्रुप ग्रामपंचायत जासई
मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
जाहिर निविदा

गुप ग्रामपंचायत जासई हद्दीतील विकास कामे खालील कोष्टकात नमुद केलेल्या निथीतून करण्याकरीता विहीत मुदतीमध्ये ठेकेदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. नं	कामाचे नाव	निधी उपलब्धता रक्कम	अंदाजपत्रकीय रक्कम	१%इसारा	टेंडर फॉर्मची किमंत	कामाचा कालावधी
१.	मौजे जासई येथिल दत्ता महादेव पाटील यांच्या घरासमोरील मोठा नाला तयार करणे	ग्रामनिधी	४००००/-	४०००/-	७५००/-	६ महिने
२	जासई येथिल अंबाजी कृष्णा घरत यांचे घरापासून ते शंकर नामा घरत यांचे घरापर्यंत आर.सी.सी. नाळा काढणे	ग्रामनिधी	३५०००/-	३५००/-	५००/-	६ महिने
३	मौजे जासई येथील गावकीच्या चाळीसमोर पाईप गटार बांधणे.	ग्रामनिधी	१९०५६/-	१९०५/-	५००/-	६महिने
४	मौजे जासई येथिल नितीन गजानन म्हात्रे यांचे घरापासून ते रविंद्र धनाजी म्हात्रे यांचे चाळी पर्यंत आर.सी.सी रस्ता तयार करणे.	ग्रामनिधी	३९७०८१/-	३९७०/-	५००/-	६ महिने

अटी व शर्ती
१. निविदा मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक १४/०६/२०२३ ते २१/०६/२०२३ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकत तसेच GST धारक ठेकेदार असावा.
३.कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखन ठेवला आहे.
४ ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २२/०६/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाणः- जासई
दिनांकः- १४/ ०६ /२०२३

सरपंच
गुप ग्राम पंचायत जासई

ग्रुप ग्रामपंचायत जासई
मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधीतून वस्तू खरेदी कामी पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

अनं	कामाचे नाव	निधी उपलब्धता	अंदाजपत्रकीय रक्कम	वस्तू पुरवठा करण्याचा कालावधी
१	किशोरवयीन मुलींना आरोग्य व स्वच्छता विषयक प्रशिक्षण	१५ वा वित्त आयोग सन २१/२२ बंधित	६३१३३/-	३ महिने
२	ग्रा.पं. हद्दीतील महिलांसाठी शिलाई प्रशिक्षण देणे	१५ वा वित्त आयोग सन २२/२३ अबंधित	३००००/-	३ महिने
३	कार्बोलिक पावडर खरेदी करणे	१५ बा वित्त आयोग सन २२/२३ अबंधित	५००००/-	३ महिने
४	सॅनिटायझर खरेदी करणे	१५ वा वित्त आयोग सन २२/२३ अबंधित	१००००/-	३ महिने
५	डास प्रतिबंधक उपाय योजनेकरीता औषधे खरेदी करणे	१५ वा वित्त आयोग सन २२/२३ अबंधित	५००००/-	३ महिने
६	रांजणपाडा येथिल गार्डनमध्ये ओपनजिम साहित्य व रांजणपाडा गार्डन व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेंचेस खरेदी करणे	१५ वा वित्त आयोग सन २१/२२ अबंधित	२५००००/-	३ महिने
७	सार्वजनिक ठिकाणी /सार्वजनिक शौचालय निर्जतुकरण करण्यासाठी आवश्यक साधन सामुग्री घेणे	१५ वा वित्त आयोग सन २२/२३ बंधित	१००००/-	३ महिने
८	डुंबा अदिवासी करीता बॅन्जो साहित्य खरेदी करणे	ग्रामनिधी १५ % मा.व.निधी	१००००/-	३ महिने
९	ग्रामपंचायत कार्यालय नावाचे फलक तयार करणे. (स्टील/एक्रालीक)नग -२	ग्रामनिधी	१५००००/-	३ महिने
१०	ग्रामपंचायत कार्यालय सभागृहाला साऊंड सिस्टम करणे	ग्रामनिधी	१००००/-	३ महिने
११	ग्रामपंचायत कार्यालयीन दप्तर ठेवणे कामी फर्निचर करणे	ग्रामनिधी	२७५०००/-	३ महिने
१२	मच्छर निर्मूळन कामी ग्रां.पं.हद्दीमध्ये औषध फवारणी व धूराळणी करणे	ग्रामनिधी	२५००००/-	३ महिने

अटी व शर्ती १. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक १४ /०६/२०२३ ते २१ /०६/२०२३ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २२ /०६/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५, कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर खरेदी वस्तूंची किमत हि PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाणः- जासई
दिनांकः-१४/०६/२०२३

ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्राम पंचायत जासई

सरपंच
ग्रुप ग्राम पंचायत जासई

महाराष्ट्र शासन
महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)
Email :- mahad.ee@mahapwd.gov.in ph. No. (02145) 222167
निविदा सूचना क्रमांक २१ सन २०२३-२०२४

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग महाड मु.पो.ता.महाड, जिल्हा रायगड, पिनकोड नं. ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक १५/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २२/०६/२०२३ रोजी सकाळी १८.०० वाजेपर्यंत www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यात येतील. व दिनांक २३/६/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पद्धतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग महाड हे भरून पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २३/०६/२०२३ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

अनुक्रमांक	कामाचे नाव	कामाची अंदाजीत किंमत	इसारा/ बयाणा रक्कम	ई-निविदा संचाची किंमत	काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन)	नोंदणी वर्ग
१	शासकीय धान्य गोदाम क्र. १ ची विशेष दुरुस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड (२०५९)	५०६२७८	६०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
२	पुई कोलाड लेप्रीसी हॉस्पिटलची विशेष दुरुस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड (२०५९)	१६०१७५	२०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
३	शासकीय धान्य गोदाम क्र. १ किरकोळ दुरुस्ती करणे. (छप्पर दुरुस्ती करणे.) तालुका रोहा, जिल्हा रायगड (२०५९)	८४२८९१	९०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
४	टेक्निकल हायस्कूल रोहा येथील कारपेंटरी वर्कशॉपची किरकोळ दुरस्ती करणे. तालुका रोहा जिल्हा रायगड (२०५९)	५२३०७७	६०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
५	रोहा येथील टेक्निकल हायस्कूल हेड मास्टर यांच्या निवासस्थानाची किरकोळ दुरुस्ती करणे, तालुका रोहा, जिल्हा रायगड (२०५९)	८४३८३६	९०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
६	वैद्यकीय अधिक्षक निवासस्थान माणगावची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका माणगाव जिल्हा रायगड (२०५९)	७७२१२५	८०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
७	दिवाणी न्यायाधीश निवासस्थानाची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड (२०५९)	८२६८७५	९०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
८	माणगाव तालुक्यातील शासकीय इमारतीचे ध्वजस्तंभची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड (२०५९)	३२८९३६	४०००	५९०/-	३ महिने	वर्ग आठ व वरील
९	अतिरिक्त न्यायाधीश, निवासस्थानाची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड	८४३८५६	९०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
१०	श्रीवर्धन येथील सा.बां. कर्मचारी निवासस्थानाची किरकोळ दुरुस्तीकरणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (संरक्षक भिंत बांधणे) (२२१६)	४१३०७०	५०००	५९०/-	३ महिने	वर्ग आठ व वरील
११	शासकीय विश्रामगृह म्हसळा येथे किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (संरक्षक भिंत बांधणे.इ.) (२०५९)	८२६८६३	९०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
१२	म्हसळा येथील गोदामाची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (गोदामाच्या भोवती रस्त्याची दुरुस्ती करणे.इ.) (२०५९)	४२१९२०	५०००	५९०/-	३ महिने	वर्ग आठ व वरील
१३	शासकीय विश्रामगृह श्रीवर्धन येथे किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (संरक्षक भिंत बांधणे. इ.) (२०५९)	८३५३६१	९०००	५९०/-	३ महिने	वर्ग सात व वरील
१४	शासकीय विश्रामगृह म्हसळा किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड रस्त्याची दुरुस्ती करणे. (आवारातील रस्त्याची दुरुस्ती करणे इ.) (२०५९)	४०४७०१	५०००	५९०/-	३ महिने	वर्ग आठ व वरील
१५	शासकीय विश्रामगृह श्रीवर्धन किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (आवारातील रस्त्याची दुरुस्ती करणे.) (२०५९)	४१२९७८	५०००	५९०/-	३ महिने	वर्ग आठ व वरील
१६	सा.बां. उपविभागीय कार्यालयाची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड आवारातील रस्त्याची दुरुस्ती करणे.) (२०५९	४०४७७३	५०००	५९०/-	३ महिने	वर्ग आठ व वरील

टिपः १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२५४६
दिनांक : १३/०६/२०२३

सही/-
(एम.आर.नामदे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.)विभाग महाड

विमाका/कोवि/२०२३-२०२४/६८

निवडक

शालेय वस्तूंचे वाटप

पनवेल : भाजपचे पनवेल शहर खजिनदार आणि समाजसेवक संजय जैन यांनी आपला वाढदिवस लहान मुलांना शालेय वस्तूंचे वाटप करून लहानग्यांच्या साथीने साजरा केला. संजय जैन आपला वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवा साजरा करत असतात. यंदाही त्यांनी वाढदिवसानिमित्त पनवेल शहरातील लक्ष्मी वसाहत येथे ओम साई मित्र मंडळातर्फे लहान मुलांना शालेय वस्तूंचे वाटप केले. यावेळी संजय जैन यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

घरफोडीत दागिने लंपास

पनवेल : घराचे मुख्य प्रवेश द्वाराचा कोंडा तोडुन त्यावाटे आतमध्ये प्रवेश करून घरातील ३ लाख ८७ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना तळोजा फेज १ येथे घडली आहे. तळोजा फेज १, सेक्टर २, बागवान पैलेस येथे राहणाऱ्या मोहम्मद कादर शेख (वय ४०) यांच्या घरात कोणीही नसल्याचा फायदा उचलून अज्ञात चोरट्यांनी घराचे मुख्य प्रवेश द्वाराचा कोंडा तोडुन त्यावाटे आतमध्ये प्रवेश करून घरातील एकूण ३ लाख ८७ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला.

मोबाईलची चोरी

पनवेल : शहरातील कर्नाळा सर्कल भाजी मार्केट जवळ असलेल्या महाराष्ट्र बँकेच्या समोर अज्ञात इसमाने एका निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याचा मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. निवृत्त शासकीय कर्मचारी चंद्रकांत वडमारे यांचा १३ हजार रुपये किमतीचा काळ्या रंगाचा व मागील बाजूस निळ्या रंगाचा वन प्लस कंपनीचा छजठऊ उए २ डखढए मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पिता-पुत्राला मारहाण

पनवेल : किरकोळ वादात पितापुत्राला शिवीगाळ करून लोखंडी सळईने मारहाण केल्याची घटना शहरातील भारत नगर येथे घडली आहे. याप्रकरणी दोन जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षाचालक मोहम्मद हुसेन रफिक शेख याचे तो राहत असलेल्या पटेल मोहल्ला परिसरातील आरोपी गुफिज शेख ,मुज्जीत शेख (२६) यांच्याबरोबर किरकोळ वाद झाला. याचा राग मनात धरून या दोघांनी मारहाण केली.

अल्पवयीन मुलगी बेपत्ता

पनवेल : राहते घरातून बाथरूमला जाते असे सांगून बाहेर गेलेल्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची घटना गव्हाण फाटा येथे घडली आहे. सदर मुलीची उंची पाच फूट २ इंच, वर्ण सावळा, बांधा मजबूत, डोक्याचे केस काळे व लांब, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, अंगात चॉकलेट रंगाचा टॉप व काळ्या रंगाची लेगीज पॅन्ट माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फडतरे यांच्याशी संपर्क साधावा.

कृषीवलचा दणका: ठेकेदार, प्रशासन ताळ्यावर

नदीतील बांधकामामुळे माणगावला पुराचा धोका!

काळनदीत बांधकाम, दगडाचे ढिगारे

माणगावमध्ये काळ नदीतील भराव काढला

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव काळ नदीवर असणारा ब्रिटिशकालीन पूल हा वाहतुकीसाठी अपुरा पडत असल्याने या पुलालगत दुसरा नवीन पूल शासनाकडून बांधण्याचे काम काही दिवसापासून सुरु झाले आहे. त्या पुलाच्या विस्तारीकरणासाठी संबंधित ठेकेदाराने काळ नदीत पिल्लर उभे करण्यासाठी मोठे खड्डे मारले होते. त्या खड्ड्यातील कातळ मोठ्या प्रमणात निघाला असून, त्या दगड व डबराचे ढिगारे संबंधित ठेकेदाराने नदीतच ठेवल्यामुळे या पावसाळ्यात पुराच्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन काळ नदीचे पाणी माणगाव व परिसरातील गावात शिरून धोका निर्माण होणार असल्याबाबत माणगावचे जागरुक व प्रसिद्ध व्यापारी खेमचंद उर्फ विजय मेहता यांनी संबंधित अधिकारी व प्रसिद्धी माध्यमांच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत वृत्त कृषीवलमध्ये प्रकाशित झाले होते. त्याची महामार्ग व संबंधित ठेकेदाराकडून दखल घेऊन काळ नदीतील दगडाचे ढिगारे हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु केले आहे.

संबंधित ठेकेदाराने गेल्या पाच महिन्यांपासून माणगाव येथील काळ नदी व कळमजे फाटा येथील गोद नदीमध्ये पिल्लर उभे करण्यासाठी मोठे मोते खड्डे मारले होते. त्या खड्ड्यांच्या उत्खननातील निघालेली मोठ्या प्रमाणात माती, दगड हे या नदीतच ठेवले होते. त्यामुळे या पावसाळ्यात शेकडो कि.मी.वरून येणाऱ्या नदीच्या पाण्याचा प्रवाह बंद झाला होता. त्यामुळे पुराच्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन हे पाणी माणगाव व परिसरातील भागातील गावात घुसण्याचा धोका होता. श्री. मेहता यांनी ही बाब विविध खात्याचे मंत्री, खासदार, आमदार तसेच महामार्गाचे अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली. हा पूल वाहतुकीसाठी अपुरा पडत असल्याने या पुलावर वाहतूककोंडी सतत होते. त्यामुळे प्रवासी, नागरिक व ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून या पुलालगत नवीन दुसरा पूल बांधण्याचे राष्ट्रीय महामार्ग विभागाने एका ठेकेदारामार्फत काम सुरु आहे.

या कामाला तब्बल पाच महिने झाले. पावसाळा सुरु झाल्याने पाऊस कधीही पडून नदीला पूर येईल. या नदीचे पात्र मोठे असून, सह्याद्रीच्या पर्वत रांगातून उगम पावलेल्या काळ, गोद, या निसर्गनिर्मित नद्यांचा प्रवाह मोठा आहे. या नद्यांच्या परिसरात शेकडो गावे उभी आहेत. कुंभे ते गोरेगाव असा प्रवास करणारी काळनदी ही सुमारे ७५ किमीचा प्रवास करून वाहते. तर गोदनदी माणगाव तालुक्यात सुरु होते. तीचा संगम जुने माणगाव येथे काळ नदीवर होतो. या नदीच्या पुलाचे कामही सुरु असून, त्या नदीवरही माती भराव टाकून पाणी जाण्याचा मार्ग अडवला आहे.

सर्वसामान्यांच्या मुलभूत समस्यांना वाचा फोडण्याचे ब्रीद वाक्य जोपासणाऱ्या कृषीवलचा दणका हा नाठाळ ठेकेदार आणि प्रशासनाला सातत्याने बसला आहे. त्याचा अनुभव माणगाव आणि मुरुडमधील आदिवासी जनतेला मंगळवारी आला.माणगावमधील काळ नदीच्या पात्रात भराव केल्याने पुराचा धोका अशा आशयाचे तर मुरुड तालुक्यातील आदिवासीवाड्या तहानलेल्याच या आशयाचे सचित्र वृत्त दै.कृषीवलच्या १२ जूनच्या अंकात प्रसिद्ध झाले. त्या वृत्ताने संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाचे डोळे उघडले.त्यांनी तातडीने कार्यवाही करीत काळ नदीतील भराव बाजुला करण्याचे काम सुरु केले. तर मुरुडमधील आदिवासी वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करण्यात आला.

आदिवासीवाडीला टँकरने पाणी!

आदिवासीवाड्या तहानलेल्याच

■ हंडाभर पाण्यासाठी पायपीट, नशिबी मात्र दूषित पाणी

■ ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

। कोर्लई । वार्ताहर ।

मजगांव आरावघर-घानवड आदिवासीवाड्या योजना राबवूनही तहानलेल्या :पायपीट करून तुटलेल्या अर्धवट विहीरीतील दुषित पाणी प्यावे लागत असून यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर असून तातडीने पाणी पुरवठा करण्यात न आल्यास सामाजिक कार्यकर्ते जनार्दन काबूकर आदिवासी बांधवांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे वृत्त कृषीवलमधून प्रसिद्ध झाले.मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी सदर वृत्ताची तातडीने दखल घेऊन याठिकाणी टँकरने पाणी मिळाल्याने आदिवासी बांधवांनी समाधान व्यक्त केले.

शासनाच्या योजना राबविण्यात येऊनही मे महिन्यात कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. घानवड आदिवासी वाडीतील महिलांना अनेक दिवसांपासून जवळील नदीतील डव-यातील पाणी प्यावे लागत असून आरावघर- आदिवासी वाडीतील कूपनलिकेला पाणी नसल्याने जवळ पायपीट करून तुटलेल्या अर्धवट विहीरीतील दुषित पाणी प्यावे लागत आहे. यामुळे पाणी टंचाई बरोबर येथील आदिवासी बांधवांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत आदिवासी बांधव सखाराम तफीसर यांनी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन काबूकर यांच्याशी संपर्क साधून समस्या कथन केली असता घानवड आदिवासी वाडीतील महिलांना जवळील नदीतील डवऱ्यातील (खड्ड्यात) अशुद्ध पाणी प्यावे लागत असल्याचे वृत्त समजताच आमच्या प्रतिनिधीने जनार्दन काबूकर यांच्या समवेत प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन तहसीलदार रोहन शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी अरविंद देशमुख, वरदा मयेकर यांना आदेश देण्यात येऊन तात्काळ याठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला. यावेळी जनार्दन काबूकर, सखाराम तफीसर व आदिवासी बांधवांनी तहसीलदार रोहन शिंदे यांचे आभार मानले.

नेरळच्या हुतात्मा चौकात अद्ययावत स्वच्छतागृह

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या हुतात्मा चौकातून पर्यटक माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी जात असतात. त्या ठिकाणी थांबणाऱ्या महिला पर्यटकांची परिसरात स्वच्छतागृह नसल्याने मोठी गैरसोय होत होती. दरम्यान, हुतात्मा स्मारक समितीच्या मागणीनंतर तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य अनसूया पादीर यांच्या शिफारशीनुसार तेथे स्वच्छतागृह मंजूर झाले आहे. नेरळ विकास प्राधिकरणमधून मंजूर झालेल्या हुतात्मा चौक परिसरातील स्वच्छतागृहाच्या कामाचा शुभारंभ सरपंच उषा पारधी आणि जिल्हा

परिषद माजी सदस्य अनुसया पादीर यांच्या हस्ते करण्यात आले.

गतवर्षी अनुसया पादीर यांनी नेरळ विकास प्राधिकरण मधून स्वच्छतागृहबांधण्याच्या कामासाठी नेरळ विकास प्राधिकरणकडून निधी देण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. त्यासाठी आवश्यक कागदपत्रेही नेरळ ग्रामपंचायत कडून सरपंच उषा पारधी आणि उप सरपंच मंगेश म्हसकर यांच्याकडून देण्यात आली होती. त्यांनतर तेथे सार्वजनिक स्वच्छतागृहाचे काम मंजूर झाले असून, त्यासाठी १५ लाखांचा निधी प्राधिकरणकडून उपलब्ध करून देण्यात आला आहे.

महिला आणि पुरुषांसाठी प्रत्येकी तीन स्वच्छतागृह अशी व्यवस्था केली जाणार आहे. तसेच पर्यटकांसाठी चेंजिंग रूम देखील त्यात असणार आहे. अशा अद्ययावत स्वच्छतागृह निर्मितीच्या कामाचा भूमिपूजन सोहळा आज सरपंच उषा पारधी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आणि जिल्हा परिषद माजी सदस्य अनसूया पादीर यांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे, रायगड भूषण किशोर गायकवाड, तसेच नेरळ टॅक्सी संघटनेचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

स्मशानभूमीतील शेडची दुरवस्था

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीतील शेडची दुरवस्था झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सदरची शेड पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. याच स्मशानभूमीमध्ये नगरपरिषदेने गॅस शवदाहिनी कार्यान्वित केली आहे. सदर शेडचा उपयोग हा स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी करायचा आहे. परंतु, या स्मशानभूमीचे वॉल कंपाऊंड बांधताना, तसेच गॅस शवदाहिनीचे बांधकाम करताना संबंधित ठेकेदारांनी शेडमध्ये सिमेंट उतरवून ठेवलेले पाहायला मिळत होते. समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या धूप प्रतिबंधक सुशोभित बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. परंतु, सदर शेड मोडकळीस आलेली असतानादेखील नगरपरिषदेकडून तिची दुरुस्ती करण्यात येत नाही. अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी स्मशानभूमीमध्ये जागा उपलब्ध नसल्याने हाल होणार आहेत.

पुलाचीवाडीमध्ये पाणीटंचाई

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरालगत असलेल्या किरवली ग्रामपंचायतीमधील पुलाची वाडीमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्या ठिकाणी रेल्वे प्रशासनाकडून कोणतीही कामे केली जात नसल्याने ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर जावे लागत आहे. किरवली हद्दीतील पुलाचीवाडी येथील बोअरवेलची जमीन मुंबई-पुणे रेल्वेमार्गाच्या विस्तारीत कामासाठी संपादित झाल्याने पुलाचीवाडी, ज्ञानदीप सोसायटी व बोरवाडी येथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याने ग्रामस्थांचे हाल होत आहे.

विजेचा शॉक लागून गायीचा मृत्यू

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मंगळवारी पहाटेपासूनच मुरुड शहरात पावसाला जोरदार सुरुवात झाली होती. मुरुड महावितरणचा पुन्हा एकदा भोंगळ कारभार समोर आला आहे. मुरुड शहरातील मारुती नाका परिसरात एका गायीचा विजेच्या खांबाला स्पर्श होताच तिचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

महावितरण ने पावसाळ्यापूर्वी आपली यंत्रणा व्यवस्थित न ठेवल्याने आज एका गाईचा मुरत्यू झाला आहे.पावसाळ्यापूर्वी विजेचे पोल तपासून पोल मधून वीज प्रवाह जात असेल तर त्याच वेळीच उपाय योजना करणे खूप आवश्यक असताना याकडे मुरुड

महावितरणचा भोंगळ कारभार उघड



महावितरण ने दुर्लक्ष केल्यामुळे आज ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. आज पाळीव प्राणी मूर्त्यू झाला उद्या मानवी मूर्त्यु सुधा होऊ शकतो यासाठी मुरुड महावितरण ने सर्व पोल ची तपासणी करून लवकरात लवकर उपाय योजना करावी अशी आग्रही मागणी मुरुड शहरातील नागरिकांकडून होत आहे.

याबाबत मुरुड महावितरण ने सांगितले की अशी घटना पुढे घडू नये यासाठी मुरुड शहरातील सर्व पोल ची तपासणी करून सर्व व्यवस्था चोख बजावण्यात येईल असे आश्वसथ करण्यात आले आहे.

दहावीच्या परीक्षेत ८० टक्के गुण

गरिबीवर मात करीत सिध्दीचे उज्ज्वल यश

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगरातील रहिवासी सचिन भानुदास गोरेगावकर यांची कन्या व माणगाव श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी सिद्धी गोरेगावकर या गरीब कुटुंबातील मुलीने इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून अथक परिश्रम घेत अभ्यास करून दहावी शालांत परीक्षेत ८०.६० टक्के इतके गुण संपादन करून ती उत्तीर्ण झाली आहे. तिने मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल तिचे संगमेश्वर नगरासह माणगाव तालुक्यातून सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या दहावी परीक्षेत माणगाव श्रद्धा इंग्लिश मिडीयम स्कूलची गरीब कुटुंबातील विद्यार्थिनी सिद्धी गोरेगावकर हिने अथक परिश्रम घेत दहावीत ८०.६० टक्के इतके गुण मिळवून आपल्या आई-वडिलांच्या मेहनतीचे चीज केले. आपल्या या यशात आपले आई-वडील यांची मेहनत व शिक्षक वर्ग यांचे मोलाचे ठरले असल्याचे सिध्दीने प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगून यापुढे मी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या माणगाव जुनिअर कॉलेजमध्ये अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेणार असल्याचे सांगितले. या यशाबद्दल तिचे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव, संजयअण्णा साबळे, रवींद्र मोरे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, श्रद्धा इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका हेगडे मॅडम, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, नगरसेवक दिनेश रतवडकर, युसुफ शेख, युनूस पिलपिले, नातेवाईक, मित्रपरिवार, संगमवसवर नगरातील ग्रामस्थांनी अभिनंदन करून सिद्दीला पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शेंडीला हिसडे

एकनाथ शिंदे आणि मंडळी म्हणजे भाजपसाठी असून अडचण आणि नसून खोळंबा असा प्रकार पहिल्यापासूनच होता. आता त्यांचे संबंध प्रत्यक्ष फाटायला सुरुवात झाली आहे.भाऊसाहेबफुंडकरप्रदेशाध्यक्ष असताना भाजपनेशत-प्रतिशत भाजपचा नारा सर्वप्रथम दिला होता. त्यावेळी तर मूळ सेना-भाजप युती अस्तित्वात होती. तिचे शिल्पकार बाळासाहेब ठाकरे व प्रमोद महाजन यांच्यातले संबंध उत्तम होते. तरीही भाजपने आपला हेका सोडला नव्हता. उलट प्रदेश कार्यालयात शत-प्रतिशतचा नारा आणि नकाशा ठळकपणे लावलेला होता. मुद्दा असा की, आपल्या युतीत असलेल्यांना गिळून टाकणे हा भाजपचा सनातन इतिहास राहिलेला आहे. आता त्याचीच पुनरावृत्ती शिंदे गटाबाबत चालू आहे. गेल्या वर्षी,मुळात, चाळीस आमदारांच्या गटवाल्यांना मुख्यमंत्री करायला भाजपच्याएकशेपाचांचा विरोध होताच. देवेंद्रफडणवीस मुख्यमंत्री झाले नाहीत याबद्दल चंद्रकांत पाटील यांच्यापासून अनेकांनी जाहीर दुःख व्यक्त केले होते. पण दिल्लीतील भाजप श्रेष्ठींचे दोन हिशेब होते. एक म्हणजे त्यांना देवेंद्रांनावेसण घालून खरा बॉस कोण आहे हे दाखवून द्यायचं होतं. दुसरं म्हणजे शिवसेना फोडल्यामुळे निर्माण होणारी शिवसैनिकांची नाराजी थोपवायची होती. यातला देवेंद्रफडणवीस यांची नाकेबंदी करण्याचा हेतू काही प्रमाणात साध्य झाला. पण शिंदे यांना मुख्यमंत्री केल्यामुळे खरी शिवसेना भाजपसोबत किती प्रमाणात गेली हा प्रश्नच आहे. निवडणुकांनंतरच त्याचे खरे उत्तर मिळेल. पण तूर्तास तरी उद्धव यांची लोकप्रियता कमी होण्याऐवजी वाढलेलीच दिसते आहे. शिवाय सेनेचे नाव व निवडणूक चिन्ह ठाकऱ्यांकडून काढून घेणे, सेनेच्या समर्थकांविरुध्दसीबीआयच्याचौकशा लावणे, शिंदे गटात आलेल्यांना मात्र अभय देणे असले उपद्व्याप केल्याने खुद्द भाजपच्या भक्त मंडळींनाही हे सर्व अति झाले असे वाटू लागले आहे. याच कारणामुळे आधी युध्दाची घोषणा करून अंधेरीच्यापोटनिवडणुकीतूनभाजपला माघार घ्यावी लागली आणि कसब्यामध्येदणकून पराभव पदरी आला.

शिंद्यांनी चकवले

मुंबई पालिकेसाठी कितीही गर्जना केल्या तरी निवडणूक सतत लांबणीवर टाकण्याचे कारणही तेच आहे. महाविकास आघाडीमध्ये नळावरच्या सारखी भांडणे चालू आहेत. सगळे जण स्वतःला श्रेष्ठ मानणारे आहेत. याचा परिणाम म्हणून आघाडीविषयी राग आणि भाजपविषयी प्रेमाची लाट येईल अशी अमित शाह आणि मंडळींची अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात हे सगळेच उलटे झाले. आता शिंदे गट नावाचे लोढणे कसे काढून टाकावे यासाठी भाजपचे चाणक्य शेंडींलाहिसडे देत आहेत. एकनाथ शिंदे हे अगदीच आपल्या ताटाखालचे मांजर होतील व शिंदे गट हा एकसंध राहणार नाही अशी बहुधा भाजपची एक वर्षापूर्वीची कल्पना होती. ठाकऱ्यांविना असलेल्या शिंदे गटावर आपोआप फाटाफूट होईल व त्याचा फायदा आपल्याला घेता येईल असे मांडे भाजपवाले खात होते. पण एकनाथ शिंदे अधिक तयारीचे निघाले. एकीकडे सदैव मोदी आणि शाह यांचे गुणगान करायचे, पण आपले अधिकार सोडायचे नाहीत हे त्यांनी अचूक साधले. दुसरीकडे उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांची सेना जितकी बावळट आणि बावचळलेली वाटत गेली तितकीच शिंदे सेना अधिक धूर्त दिसून आले. आता जसजशा निवडणुका जवळ येत चालल्या आहेत तसतशी भाजप नेत्यांची अस्वस्थता वाढत चालली आहे. अलिकडेच भाजपने राज्य विधानसभेच्या सर्व २८८ आणि लोकसभेच्या ४८ जागांवर लक्ष ठेवण्यासाठी पूर्णवेळच्याप्रभारींची नियुक्ती जाहीर केली. म्हणजेच या सर्व जागांवर भाजपचा डोळा असल्याचे स्पष्ट झाले. २०१४ मध्ये राज्य भाजपने त्याचा अनुभव घेतलाही आहे. आता तर तेव्हापेक्षा अधिक चांगले वातावरण आहे, असे भक्तांना वाटते. यामुळे शिंदे गटाचे आमदार व खासदार नाराज होणार आणि आपल्या युतीत ठिणगी पडणार हे भाजपला चांगलेच ठाऊक आहे. तरीही भाजपने आपला निर्णय बदललेला नाही.

ठाण्यावरच हल्ला

प्रतिस्पर्ध्यांच्या थेट मर्मस्थळावर हल्ला करणे हे मोदींच्याभाजपचे वैशिष्ट्य आहे. राहुल गांधींनाअमेठीतून बेदखल करणे असो की ममता बॅनर्जींनानंदीग्राममधून हरवणे हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातच सुरु केलेली कुरबुर ही त्याची मराठी आवृत्ती आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये थेट हाणामारी झाली होती. त्यानंतर भाजपवाल्यांची कामे ठाण्यात होत नाहीत असे म्हणून भाजपचे स्थानिक आमदार व नगरसेवकांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत शिंदे यांच्यावरच तोफ डागली. आता तर थेट शिंदे यांचे चिरंजीव खासदार असलेल्या कल्याणवरभाजपने हक्क सांगितला आहे. शिवाय, शिंदे गटावर बहिष्काराची भाषा झाली आहे. भाजपच्या आक्रमक पवित्र्यामुळे शिंदे गटाच्या चौदा खासदारांमध्ये चलबिचल आहे. राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार न झाल्याने अनेक आमदारही अस्वस्थ आहेत. त्यातच गुलाबराव पाटील, अब्दुल सत्तार, संदिपानभुमरे, संजय राठोड आणि तानाजी सावंत इत्यादींनाकाढून दुसऱ्या आमदारांना घ्या असे अमित शाह यांनी सांगितल्याच्या बातम्या आहेत. आता देवेंद्रफडणवीसांनी त्यांची भेट घेऊन सारवासारव करण्याचा प्रयत्न केला तरी असंतोषाचा भडका सहजीविझणारा नाही. आज शिंदे गटातर्फे प्रसिध्द झालेल्या जाहिरातींमधून देवेंद्रफडणवीसांनाकटाप केलेले आहे. शिवाय शिंदे हेच लोकप्रिय मुख्यमंत्री असल्याचे एका सर्वेक्षणात आढळल्याचे सांगून भाजपला डिवचले आहे. ठाकरे यांना विरोध या एका मुद्द्याच्या आधारे शिंदे गट आणि भाजप यांनी गेले वर्षभरएकदिलाने वाटचाल केली. पण या एकीचा पाया भुसभुशीत होता. भाजपने आपले खायचे दात काढल्यानंतर तो कोसळला आहे. लोकसभा आणि त्यानंतरच्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत एकट्याच्या जिवावरच सत्ता आली पाहिजे हा भाजपचा कटाक्ष आहे. कर्नाटकानंतर तर तो अधिक सावध झाला आहे. त्यामुळे शिंदे गटातल्या हमखास निवडून येतील अशांना फोडून भाजपमध्येयेण्यास भाग पाडणे हे त्याचे डावपेच दिसतात. पण एकनाथ शिंदे हे चाणक्यांच्या शेंडीला आणि डोक्याला चांगलाच ताप देतील अशी लक्षणे आहेत.

विचार

रक्तदान सातत्याने करणे आवश्यक

जागतिक आरोग्य संघटना, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेड क्रॉस आणि रेड क्रिसेंट सोसायटीज यांच्या संयुक्त पुढाकाराने २००५ मध्ये पहिल्यांदा रक्तदाता दिन आयोजित करण्यात आला होता. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असतांना स्वैच्छिक रक्तदान चळवळ जनजागृती साठी युवाशक्तींनी पुढे येणे काळाची गरज आहे. देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वैच्छिक रक्तदान कमी प्रमाणात आहे. यासाठी जास्तीत जास्त लोकांनी स्वैच्छिक रक्तदान मोहिम राबवून आपण अनेक रुग्णांचे प्राण वाचवून देशाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात हातभार लावू शकता.१४ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या रक्तदान दिनात सहभागी होऊन आपले कर्तव्य निभावा.

हॅलो, मी रक्तदाता बोलतोय, मला समजलेकी, आपल्या रुग्णास रक्ताची गरज आहे.....मी रक्तदान करण्यास तयार आहे....! असा रक्तदाता नेहमीच रुग्णांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

यावर्षीचे शासनाचे घोषवाक्ये
रक्त द्या, प्लाझ्मा द्या, वारंवार द्या,
एखाद्याच्या जीवनाचा हिस्सा बना !
Give Blood, give plasma,share life, share often.

आजच्या युवापिढीत रक्तदानाविषयी समज गैरसमज दूर करणे काळाची गरज आहे. आजच्या काळात सोशल मीडियाचा योग्य वापर केल्यास सहज शक्य होऊ शकते.?

स्वैच्छिक रक्तदाता म्हणून आपण जेवढे समाजातील लोकांना जागृत कराल तेवढी माहिती जनमानसात रुजेल. आजकाल सोशल मिडिया, डिजिटल मिडिया प्रिंट मिडिया आदी माध्यमातून समाजात जनजागृती करतांना पाहायला मिळते. आजकाल रक्ताची गरज कुणालाही असो, व्हाट्सएपच्या माध्यमातून सर्वांपर्यंत मेसेज पोहचिला जातो. यात सामाजिक बांधिलकी जोपासणारे रक्तदात्यांचा सिंहाचा वाटा आहे. आज पावतो आपल्या देशात अनेक प्रगतीच्या वाटा निर्माण झाल्या पण मानवी रक्तासाठी कोणत्याही पर्याय आजपावतो मिळाला नाही.

रक्त हे कुठल्याही प्रयोगशाळेत तथा कारखान्यात तयार होत नसते, हे आजही सर्व सामान्य माणसाला माहीत आहे.पण ते तयार होते तुमच्या आमच्या मानवी शरीरात....! याबाबतीत समाजात रक्तदानाविषयी सामाजिक बांधिलकी आपल्या जनमानसात रुजणे आवश्यक आहे.

एकेकाळी रक्त मिळणेसाठी रुग्णांच्या

हेमंकात सोनार

नातेवाईकांना भरपूर ठिकाणी संपर्क साधावा लागत होता. पण शासनाच्या मार्गदर्शक ध्येय धोरण तसेच शासकीय पातळीवर जनजागृतीपर अनेक युवक रक्तदान करण्यासाठी पुढे येतात याचे कारण ही तसेच आहे...? प्रत्येक रुग्णांना रक्त मिळणार तरी कोठून? आपणच रक्तदान नाही केले तर रुग्णांना जीवदान मिळणार कसे? ही भावना आतापर्यंत सर्व जनमानसापर्यंत पोहचणे आपली सामाजिक बांधिलकी आहे.

यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रभातफेरी, स्वैच्छिक रक्तदान शिबिरे, पोस्टर्स स्पर्धा, इ.रक्तदात्यांमध्ये जनजागृतीपर प्रयत्न केला जातो.

ज्यांच्या रुग्णांना वेळेवर रक्तपुरवठा होऊन जीव वाचलेला असतो याची जाणीव असलेल्या रुग्णांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आदी यांना स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व पटलेले असते.

त्यांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी झाले पाहिजे. रक्तदानाचे फायदे कॅन्सर, हार्टअॅटॅक इ. धोक्याचे प्रमाण कमी असते. तसेच कोलेस्टेरॉलचे प्रमाण आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

रस्त्यावर झालेला अपघातात अतिरक्तस्राव झालेला व्यक्ती, प्रसूती वेळी अथवा प्रसूतीनंतर अतिरक्तस्राव झालेल्या महिलेला वेळीच रक्त मिळाले तर नक्कीच त्यांचे प्राण वाचविल्याचे रक्तदाता म्हणून समाधान मिळते.

या व्यतिरिक्त अॅनेमिया, शस्त्रक्रिया, कर्करोग आदी रुग्णांना रक्ताची गरज भासते. यासाठी निस्वार्थपणे स्वैच्छिक रक्तदाता म्हणून रक्तदान करणे महत्त्वाचे आहे.

याच बरोबर थॅलेसेमिया, सिकलसेल यासारखे दुर्मिळ आजाराने ग्रासलेल्या काही बालकांमध्ये जन्मजात रक्त तयार होण्याचे प्रमाण अत्यल्प कमी असते.

त्यामुळे त्यांचे योग्य निदान करून वैद्यकीय सल्लानुसार रक्तपुरवठा केला जातो. अश्या रुग्णांचे प्रमाण देशात भरपूर आहे. त्यांना महिन्यातून किमान दोन वेळेस तरी वैद्यकीय सल्ल्यानुसार रक्तपुरवठा केला जातो. अशा रुग्णांना वेळो वेळी रक्त द्यावे लागते यासाठी आपली सर्वांची सामाजिक बांधिलकी नात्याने नैतिक जबाबदारी आहे. यासाठी आपण रक्तदान शिबीर अथवा रक्तकेंद्रात जावून शासन मान्यता प्राप्त रक्तपेढी/रक्तकेंद्रात आपले रक्तदाता म्हणून स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे ठरते. यासाठी आपण कोणत्याही शासन मान्यताप्राप्त रक्तपेढी/रक्तकेंद्र येथून रक्त घेणे कधीही फायदेशीर आहे.

रक्तदाता म्हणून आपले वय १८ -६० वर्षेपर्यंत व वजन ४८किलो पेक्षा जास्त तसेच शरीरातील हिमोग्लोबिन योग्य प्रमाण(१२.५% वर) असलेल्या निरोगी व्यक्ती रक्तदान करु शकता. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्तकेंद्रात अथवा रक्तदान शिबिरात विविध तपासणी करून रक्तसंकलन केले जाते.

रक्ताच्या दिशानिर्देश नुसार सर्व चाचणी (एड्स, कावीळ अ,ब आणि गुप्तरोग, मलेरिया, रक्तगट, क्रासमॅच इ.) केल्यानंतरच रुग्णांना सुरक्षित रक्तपुरवठा केला जातो. आपण केलेले स्वैच्छिक रक्तदान यासाठी शासन नियमानुसार दोन वर्षातून एकदा मोफत रक्त मिळते. याचा लाभ आपण घेऊ शकता.

रक्त हे जास्त काळ साठवून ठेवू शकत नाही (रक्तदान केल्यापासून फक्त ३५ दिवस) यासाठी रुग्णांना सतत रक्ताची गरज भासते.

१४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त एवढेच आपल्याला आवाहन करण्यात येते की, स्वैच्छिक रक्तदान ही काळाची गरज ओळखून आपल्या जवळच्या शासन मान्यता प्राप्त रक्तपेढीत आपण जबाबदार भारतीय नागरिक रक्तदाता म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासून निस्वार्थपणे स्वैच्छिक रक्तदान करावे.

रक्तदानानंतर शासनाच्या मार्गदर्शक सूचना नूसार रक्त व रक्ताचे विघटन करून प्लाझ्मा, लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी आणि प्लेटलेट्स, क्रायोप्रेसिपिटेड

आदी विघटन तयार करुन वैद्यकीय सल्ल्यानुसार रुग्णांना पुरवठा केला जातो. यासाठी आपले स्वैच्छिक रक्तदान महत्वाचे ठरते.

या वर्षीचे शासनाचे घोषवाक्य
Give Blood, give plasma,share life, share often.

रक्त द्या, प्लाझ्मा द्या, वारंवार द्या, एखाद्याच्या जीवनाचा हिस्सा बना !

१४ जून १८६८ रोजी जन्मलेल्या कार्ल लँडस्टेनर यांच्या जयंतीनिमित्त जागतिक रक्तदाता दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. एबीओ रक्तगट प्रणालीचा शोध घेऊन आरोग्य विज्ञानातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले.

सोशल मीडिया, व्हाट्सएपच्या ग्रुप च्या माध्यमातून रक्तदाता व्हाट्सएप ग्रुप तयार करून स्वैच्छिक रक्तदान चळवळ यशस्वीपणे रुजविता येऊ शकते.

जागतिक आरोग्य संघटना, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेड क्रॉस आणि रेड क्रिसेंट सोसायटीज यांच्या संयुक्त पुढाकाराने २००५ मध्ये पहिल्यांदा रक्तदाता दिन आयोजित करण्यात आला होता.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असतांना स्वैच्छिक रक्तदान चळवळ जनजागृती साठी युवाशक्तींनी पुढे येणे काळाची गरज आहे. देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वैच्छिक रक्तदान कमी प्रमाणात आहे. यासाठी जास्तीत जास्त लोकांनी स्वैच्छिक रक्तदान मोहिम राबवून आपण अनेक रुग्णांचे प्राण वाचवून देशाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात हातभार लावू शकता.

मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाची प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज करून रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी. १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्ताने समाजात/रक्तदात्यांमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती पर व्हावी ऐवढाच उद्देश !

या निमित्ताने.!
रक्त द्या, प्लाझ्मा द्या,वारंवार द्या,
एखाद्याच्या जीवनाचा हिस्सा बना !

आजकाल

उपनिषदांच्या अभ्यासाची शताब्दी



जानेवारी १९२३ पासून विनोबांनी 'महाराष्ट्र धर्म' मासिक सुरू केले. १८ जून १९२३ रोजी, झेंडा सत्याग्रहात भाग घेतल्याने विनोबांना तुरुंगवास झाला आणि अवघे चार अंक निघून हे मासिक बंद पडले!!

मात्र 'महाराष्ट्र धर्म' मासिकात विनोबांनी 'उपनिषदांचा अभ्यास' या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखाचे हे शताब्दी वर्ष आहे!

तेवीस वर्षानंतर, ३ जून १९४६ रोजी हे लेख 'उपनिषदांचा अभ्यास' या नावानेच पुस्तकरूपाने निघाले. 'उपनिषदांचा अभ्यास' या पुस्तकाविषयी विनोबा म्हणतात -

माझ्या दृष्टीने उपनिषद् हे पुस्तकच नाही ते एक प्रातिभ दर्शन आहे. माझ्या जीवनात गीतेने आईचे स्थान घेतले आहे. पण मला हे माहीत आहे की, उपनिषद् ही माझ्या आईची आई आहे.

विजय दिवाण

विनोबांनी लिहिलेल्या 'उपनिषदांचा अभ्यास' या पुस्तकावर, वाईच्या प्राज्ञपाठशाळेच्या अध्ययन पद्धतीचा मोठा प्रभाव आहे. १ मार्च १९१७ साली विनोबा वाईला आले. वाई येथील स्वामी केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांच्याकडे विनोबांनी ९-१० महिने उपनिषदाचा अभ्यास केला. वाई सोडल्यानंतरही त्यांचे उपनिषदांचे चिंतन मनन सुरू राहिले. प्राज्ञपाठशाळेतील अध्ययनानंतर अवघ्या पाच वर्षांनी 'उपनिषदांचा अभ्यास' ही लेखमाला त्यांनी 'महाराष्ट्र धर्मा'च्या १९२३ साली जानेवारी ते जूनच्या अंकात लिहिली. विनोबांचे हे पहिलेच प्रकाशित लेखन!! त्यावेळी विनोबा अवघे अठ्ठावीस वर्षांचे होते. व उपनिषदांची संस्कृत भाषा सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीची!

ग्रंथातील प्रत्येक वाक्य, वाक्यखंड, शब्द व वर्ण यांची सूक्ष्म छाननीकरूनच वाक्यार्थ व भावार्थ यांच्याकडे कसे जायचे, तसेच शब्दाची व्युत्पत्ती, धातू व पूर्वपक्ष-उत्तरपक्ष इत्यादींच्या आधारे विषयाची मांडणी कशी करावयाची हे विनोबांनी प्राज्ञपाठशाळेतील अध्ययन पद्धतीतून आत्मसात केले. प्राज्ञपाठशाळेतील या अध्ययन पद्धतीचा प्रभाव विनोबांच्या 'उपनिषदांचा अभ्यास' या पुस्तकावर स्पष्ट दिसतो.

'उपनिषदांचा अभ्यास' हे लेखन विद्वजड आहे. यात पांडित्याचे प्रदर्शन नसले तरी, लेखन पारंपरिक पद्धतीचे व सर्वसामान्य वाचकाला कळेल इतके सोपे नाही. स्वतः विनोबाच या लेखाविषयी म्हणतात, भाषा थोडी कठीण वाटेल आज मी लिहायला बसलो तर कदाचित वेगळ्या पद्धतीने लिहीन.

विनोबांच्या या भाषेसंदर्भात प्रा.राम शेवाळकर लिहितात,' या वेदाभ्यास जडत्वातून, गीता व गीता प्रवचनांनी विनोबांची, सरस्वतीने सुटका केली व मनाने वेदाकाशात विहरणारा हा ऋषी संतासारखा सर्वजन सुलभ व बाळबोध झाला.'

'उपनिषदांचा अभ्यास' हे विनोबांचे पुस्तक पाहिल्यावर कळते की, स्वामी केवलानंदांनी त्यांच्याकडे आलेल्या विनायकाला 'आचार्य विनोबा' करून गांधीजींकडे परत पाठविला!!

विनोबांच्या जीवनकार्याचा स्थूल अंगाने शोध घेता येऊ शकेल. पण त्यांचे आध्यात्मिक मन ज्या गीतेवर व उपनिषदांवर पुष्ट झाले आहे, त्या मनाचा शोध घेण्यासाठी 'उपनिषदांचा अभ्यास' हे पुस्तक अभ्यासावेच लागेल.

१९२३ साली लिहिलेल्या 'उपनिषदांचा अभ्यास' या लेखाला या जून महिन्यात शंभर वर्षे होत आहे. त्यानिमित्ताने हा लेखन प्रपंच.

व्हायरल

वारकऱ्यांचा संयम सुटला का?

वारीच्या प्रस्थान समयी वारकऱ्यांचा देवळात प्रवेश करू देण्यावरून संयम सुटला का? पिंपरी चिंचवड पोलिसांनी देऊळ प्रशासनाच्या विश्वस्तांशी चर्चा केली असेल तर लाठीमार करण्याचा प्रसंग पोलिसांवर येण्याचे कारण नव्हते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांच्याकडे राज्याचे गृहमंत्रीपदही आहेत. नागपूर मुक्कामी त्यांनी लाठीमार केल्याच्या वृत्ताचा इन्कार केला आहे. ह्याचा अर्थ पालखी निघताना ज्ञानेश्वरमाऊलीच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी वारक-यांनी गर्दी केल्याची बातमी चुकीची आहे. सदरची बातमी दिंडीप्रमुखांनी पत्रकारांना दिली की पिंपरी-चिंचवड पोलीस स्टेशनच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली? वर्तमानपत्रात बातम्या देण्यासाठी अधिकृत पत्रकारकक्ष निर्माण करण्याचे देवस्थानाच्या वतीने ठरवले तरी मिसरिपोर्टिंगचा प्रश्न सुटेल असे वाटत नाही. ह्या बाबतीत पुणे जिल्ह्याच्या पोलिसप्रमुखांनी ब्रीफिंग करणे हिताचे ठरले. वारीत सामील होणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्याच्या पार्श्वभूमीवर बेशिस्तीचे प्रमाण किंचित का होईना वाढलेले आहे. वारकऱ्यांच्या बेशिस्तीविरूद्ध उपाययोजना करणे केवळ देवस्थान समितीच्या किंवा दिंडी प्रमुखांच्या हातात नाही. ह्या पार्श्वभूमीवर एकच म्हणावेसे वाटते, दिंडी प्रमुखांनी देवस्थान समितीच्या विश्वस्तांशी महिनाभर आधी चर्चा करावी आणि बैठकीत जे ठरले असेल त्याची सविस्तर हकिगत आपापल्या दिंडीतील वारकऱ्यांना समजावून सांगायला हवी. म्हणजे पोलिसांनी हडेलहप्पी केली ह्या आरोपाचे निराकरण होऊ शकेल. वारकऱ्यांनी स्वयंशिस्तीने वागले तरच हा प्रश्न सुटेल. त्याचप्रमाणे पोलिसांनीही संयम सोडू नये अशी अपेक्षा आहे. पुणे जिल्ह्याच्या पोलिस प्रमुखांनीही ह्या प्रकरणाची शहानिशी करणे आवश्यक आहे.

- रमेश झवर

.....

मागे एकदा 'फास्टेस्ट फिंगर फर्स्ट'छाप घोषणांमधून पुस्तक विकत घेणार नाही, असं भडकून ठरवलं होतं. कारण पुस्तकाची खरेदी हा माझ्याकरता आनंदाचा भाग आहे. त्याला मला लॉटरीसदृश हिडीस उत्तेजनेचं वा ताणाचं रूप येऊन नको आहे. फक्त तितकं ठरवणंच पुरेसं नाही, हे आता लक्ष्यात येतं आहे. एरवी मनाला शांत करण्यासाठी, रिझवण्यासाठी, विचारप्रवण करण्यासाठी - उत्तेजित नव्हे, माइंड यू - म्हणून ज्या वस्तू होत्या, उदा. पुस्तक, त्याही आता निव्वळ वस्तू झाल्या आहेत. नुसत्या वस्तूच नव्हे, तर माझं चित्त आकर्षित करण्यासाठी गळाला लावलेलं गांडूळ झाल्या आहेत. हे आधी नव्हतं का? होतंच. पण त्याकरता मला भौतिकरीत्या बाजारात जाण्याची गरज पडत होती. त्यापासून सुटायचं असल्यास पर्याय जास्त आणि सहज होते. पण आता आसमंतात स त त अनंत वस्तूंचे आणि सेवांचे पर्याय असतात. जिथे कुठे असाल, इमेल-वत्साप-फेसबुक, बाजार, टीव्ही... तिथे सतत तुम्हांला कुणी ना कुणी काही ना काही विकत असतं. दस्तुरखुद्द तुम्हीच माल आहात, आणि ही माध्यमं तुम्हांला जाहिरातदारांना विकातहेत, आता फक्त घराच्या भिंतींवर आतल्या बाजूनं जाहिराती प्रक्षेपित व्हायच्या शिल्लक आहेत. चोवीस तास चालणारे मॉल्स, रस्त्यानं येताजाता, बसमध्ये, टीव्हीवरच्या गोष्टींच्याही आत दिसणाऱ्या चमकत्या-हलत्या-वाहत्या-भगभगत्या जाहिराती, स्क्रीनवर येणारे असंबद्ध पॉप-अप्स, नजर चाळवणारी स्क्रीनची विभागणी.. यांचा त्रास होत नाही का इतर कुणालाच?

- मेघना भुस्कुट

लोकसंसद

हॉर्न नकोच

मुंबई शहरातील वाढत्या ध्वनी प्रदूषणाला काही प्रमाणात आळा बसावा म्हणून मुंबई वाहतूक पोलिसांकडून १४ जूनला 'नो हॉर्न प्लीज' मोहीम राबविण्यात येणार आहे. वाहतूक पोलिसांचा हा उपक्रम स्तुत्य असाच आहे. जगातील सर्वाधिक ध्वनी प्रदूषण करणाऱ्या शहरांममध्ये मुंबईची गणती केली जाते. खरं तर मानवी श्रवण क्षमता साधारणपणे ७५ ते ८० डेसिबल इतकीच आहे. परंतु रस्त्यावरील वाहनांच्या हॉर्नचा आवाज १०० ते १४० डेसिबल अशा टिपेला पोहोचतो. रुग्णालये, शाळा अशा शांतता क्षेत्र असलेल्या ठिकाणीही हॉर्नचा आवाज वाढलेला असतो. कानावर सतत उच्च आवाज पातळीचा आवाज पडत राहिल्याने मानसिक आणि शारीरिक समस्या उद्भवतात. त्यातच आजकाल अनेक दुचाकीस्वार कानठळ्या बसवणारे, मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसवून दुचाकी चालवत असतात. त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस या संदर्भात जनजागृती करणार आहेत आणि सबळ कारणाशिवाय हॉर्न वाजविल्यास वाहन चालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करणार आहेत. पोलिसांनी 'नो हॉर्न प्लीज' मोहीम एका दिवसापुरती न राबवता सातत्याने राबवावी जेणेकरून हॉर्न वाजवून गोंगाट करणाऱ्या वाहन चालकांना जरब बसेल.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

पैसा

गुर्जिएफला कोणी आध्यात्मिक प्रश्न विचारला की तो पैसे मागायचा... तोंडाला येईल ती रक्कम सांगायचा... ते पैसे मिळाल्यानंतरच तो बोलायचा... कधी एखादं वाक्य, कधी एखादा शब्द कधी त्याहून थोडं जास्त.

तो पैसे घेतो म्हटल्यावर बरेच लोक त्याच्या वाटेलाच जायचे नाहीत. त्यांना तो पैसे घेऊन ज्योतिषविषयक प्रश्नांची उत्तरं सांगणाऱ्यांसारखा वाटायचा. जे त्याला ओळखून होते, ते विचारायचे, तू पैसे कशाला घेतोस? त्यांचा तुला काही उपयोग नाही? त्यांच्यातून कसलीही छानछोकीही करत नाहीस. इकडे तिकडे वाटून टाकतोस. मग पैसे घेऊन स्वतःची प्रतिष्ठा कशाला खराब करून घेतोस?

गुर्जिएफ म्हणायचा, मला प्रश्न विचारणारे जगातले सगळे व्यवहार पैशांत करतात. सगळ्या जगाच्या मापनाचं त्यांचं ते एकच एकक आहे. त्यामुळे ज्याचे पैसे पडतात, त्याची त्यांना किंमत वाटते. पैसे देऊन आपण काहीतरी किंमत मोजतो आहोत, असं त्यांना वाटतं. अशा माणसांना फुकट काही मिळालं, तर ते बिनमोलाचं वाटतं. ते फालतू आहे, असं वाटतं. त्यामुळे त्यांच्याच भल्यासाठी त्यांच्याकडून पैसे घ्यावे लागतात.

निवडक

रस्त्यावर गटाराचे पाणी

नवीन पनवेल : जुन्या पनवेल-पुणे मार्गावरील कोन फाटा ते भिंगार पनवेल येथील मार्गिकेवर गटाराचे पाणी येत असल्याने अर्धा रस्ता व्यापला आहे. गेल्या वर्षभरापासून गटार बांधण्याचे काम एमएसआरडीसीने हाती घेतले आहे. मात्र, गटाराचे काम अजूनही पूर्ण झाले नसल्याने पळस्पे फाटा जंक्शनजवळ रस्त्यावर आलेल्या गटाराच्या पाण्यातूनच वाहनांचा प्रवास सुरू आहे. पनवेलच्या प्रवेशद्वारावर पळस्पे फाट्याजवळ कोन, कोळखे गावच्या हद्दीत रस्त्याच्या कडेला असलेली गटारे तुंबलेली आहेत.

प्लास्टिक बंदीचा फज्जा

नवी मुंबई : महापालिका क्षेत्रात प्लास्टिकचा मुक्त वापर बिनबोभाटपणे सुरू झाला आहे. यात सर्वाधिक वापर फेरीवाल्यांकडून होत असून, शहरातील स्वीट मार्टपासून किरकोळ विक्रेते प्लास्टिकच्या वापरात आघाडीवर असल्याने बंदी कागदावरच आहे. महापालिकेकडून प्लास्टिक आढळणाऱ्यांवर कारवाई करत प्लास्टिक बंदीची पालिका क्षेत्रात काटेकोरपणे कारवाई करण्यात येत होती; मात्र तरीही कचऱ्यात प्लास्टिक पिशव्या आढळून येत असल्याने नवी मुंबईत प्लास्टिकबंदीचा फज्जा उडाल्याचे चित्र आहे.

गटाराचे काम सुरू

रसायनी : पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील मुख्य रस्त्यालगत सिमेंट काँक्रिटचे काम पाताळगंगा एमआयडीसीने सुरू केले आहे. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात कारखानदारी सुरू होत असताना नैसर्गिक आणि सांडपाण्याचा निचरा सुरळीत झाला पाहिजे, त्यासाठी गटार बांधण्यात आले होते. दरम्यान गटार ठिकठिकाणी फुटल्याने कारखानदारांनी नवीन गटार बांधण्याची मागणी केली होती. दरम्यान, एमआयडीसीने गटार बांधण्यास सुरुवात केल्याचे उपअभियंता श्रीकांत राऊत यांनी सांगितले.

बियाणे खरेदीची लगबग

रोहा : तालुक्यातील शेकऱ्यांकडून मशागतीच्या कामांना वेग आला असून, ही कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मान्सूनपूर्वी शेतकरीवर्गाला पेरणीचे वेध लागले असून, पेरणीची कामे वेळेवर पूर्ण व्हावीत, यासाठी रोहा कोलाड विभागात भातबियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू आहे. त्यातच यंदा मान्यताप्राप्त परवानाधारक विक्रेत्यांकडे वेळेवर भातबियाणे उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त होत आहे. तालुक्यात हळवे, निमगरवे व गरवे प्रकारातील बियाण्यांची लागवड केली जाते.

लसणाचा भाव वधारला

नवी मुंबई : एपीएमसी बाजारात लसूण, कांद्याच्या दरात पुन्हा वाढ झाली आहे. एप्रिलपासून आवक घटली असल्याने भाव वधारले आहेत. बाजारात आधी लसूण प्रतिकिलो ९० ते १२० रुपयांनी मिळत होता. आता ११० ते १५० रुपयांवर गेला आहे. तसेच पुढील काळात लसूण २०० पार करेल, अशी शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे. जानेवारी-फेब्रुवारीमध्ये नवीन लसूण बाजारात दाखल होताच दर आवाक्यात येतात; मात्र यंदा लागवडीखालील क्षेत्र कमी असल्याने उत्पादन कमी झाले आहे. त्यामुळे लसूण महागले आहे.

दिन वार्ता

पंचांग

१४ जून २०२३, बुधवार
विक्रम संवत२- २०७९
वैशाख शके संवत२- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- उत्तरायण
मास- ज्येष्ठ
ऋतु- ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:एकादशी ०८:४८:३८
नक्षत्र:अश्विनी १३:४०:१७
योग:अतिगण्ड २७:००:३४+
करण:बालव ०८:४८:३८
करण:कौलव २०:३७:३५
सूर्य:वृषभ
चन्द्र:मेष
हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - २५
विशेष
योगिनी एकादशी, संत निवृत्तिनाथ यात्रा- त्र्यंबकेश्वर
हरिबुवा पुण्यतिथी- अकोट (अकोला)

सुडोकू

8	4		9	2	7			
3	7		8	4		6		
		9					7	4
			3		2		5	
		4		9		1		
	1		7		4			
6	8					3		
		7		8	6		9	5
			2	3	1		6	8

मंगळवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

4	7	2	8	1	5	3	6	9
9	5	3	2	6	4	7	8	1
1	6	8	3	7	9	2	4	5
7	1	5	4	8	3	6	9	2
8	2	4	9	5	6	1	7	3
3	9	6	1	2	7	4	5	8
6	3	7	5	9	1	8	2	4
2	4	9	7	3	8	5	1	6
5	8	1	6	4	2	9	3	7

पहिल्याच पावसात घरात पाणी

नवीन रस्ते उंच झाल्याचा परिणाम; नागरिकांच्या तक्रारींकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

> रस्ते बनविण्यापूर्वी आम्ही नगरपरिषदेला लेखी पत्र दिले होते. जुने रस्ते खोदून नवीन रस्ते बनवा, आमची घरे रस्त्याच्या खाली गेली आहेत, आमच्या घरात पाणी शिरण्याचा धोका आहे. तरीही फक्त खोटे तोंडी वचन देऊन रस्ते उंच उंच बनविले, त्यामुळे आमचे घर रस्त्याखाली गेले आहे व पहिल्याच पावसात घरात पाणी शिरले आहे. अजून मान्सून सुरू झाला नाही तर ही परिस्थिती, मोठा पाऊस झाला तर आमच्या घरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे होणाऱ्या नुकसानीला नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील.
>
> – राहुल चोगले, नागरिक

। मुरूड । प्रतिनिधी ।

मुरूड कोळीवाड्यातील नागरिकांच्या तक्रारींची दखल न घेतल्याने दोन घरात पावसाचे पाणी शिरले होते. जुने रस्ते खोदून नवीन रस्ते बनवा, अशी मागणी नागरिकांनी केली होती. या मागणीकडे दुर्लक्ष करीत नगरपरिषदेने जुन्या रस्त्यावरती काँक्रिट टाकून नवीन रस्ते बनविल्यामुळे अखेर कोळीवाड्यातील दोन घरात पावसाचे पाणी शिरले होते.

मुरूड कोळीवाड्यातील नागरिक रुपेश केंडू व राहुल चोगले यांच्या दोन घरात रात्री पावसाचे पाणी शिरले होते. या परिसरातील नागरिकांनी मागणी केली होती की, जुने रस्ते खोदून नवीन रस्ते बनवा. तरीही प्रशासनाने दुर्लक्ष करीत रस्ते न खोदता बनविल्याने अनेक नागरिकांची घरे रस्त्याच्या खाली गेली आहेत.

खऱ्या अर्थाने अजून मान्सून सुरू झाला नाही. बिपरजॉय चक्रीवादळ सुरू असल्याने काही प्रमाणात पाऊस पडत आहे. या थोड्याच पावसात नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. जर मान्सून सुरू झाला, तर मोठ्या प्रमाणात घरात पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. तर, नागरिकांच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानीला जबाबदार कोण, असा सवाल जनमानसातून होत आहे.

श्रमिक विद्यालयात पर्यावरण दिन साजरा

। खांब । वार्ताहर ।

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे पर्यावरण दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय हरित सेनेचे विद्यार्थी व सामाजिक वनीकरण रोहा यांच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी परीक्षेत्र अधिकारी आशिष पाटील, नवपाल डी.बी. वाघे, धिरेश थळकर, सुनील लांगी, सुरेश वाघमारे, दिपक जगताप, पांडुरंग लोखंडे, रामदास नवघरे,रेश्मा शिंदे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमातंर्गत शालेय परिसरात विविध प्रकारचे रोपांची लागवड करून वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तर, विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण रोहा यांच्या वतीने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रोपांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला.

असिफ दादन यांचा सत्कार

। कोर्लई । वार्ताहर ।

कोकण मर्कंटाईल बँक ही एक सहकार क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असून कोकणी माणसाने या बँकेची मुहूर्तमेढ रोवली आहे. आजही मुंबई कोकणातील एक अग्रगण्य बँक ख्याती आह. गेल्या महिन्यात या बँकेची बिनविरोध निवडणूक पार पडली. यामध्ये चेअरमन पदी असिफ दादन तर व्हाईस चेअरमन पदी असगर डबीर यांना सर्व संचालकांनी बिनविरोध निवडून दिले आहे. कोकण मर्कंटाईल बँकेचे माजी कर्मचारी यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात खालिद कोलपेकर यांनी असिफ दादन यांचा तर खालिद आगसकर यांनी व्हाईस चेरमन असगर डबीर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक तसलीम काझी, मुल्ला हे उपस्थित होते तसेच माजी कर्मचारी लियाकत सुर्वे, इक्बाल जळगावकर, अहमद लांडगे, आश्रफ दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा

। पोलादपूर । वार्ताहर ।

पोलादपूर तालुक्यातील बाळमाची, आंबेमाची, कुडपण खुर्द, नाणेघोळ, बोरावळे, चांभारगणी बुद्रुक, खडकवणे, गोलदरा, गोळेगणी, मोरगिरी, किनेश्वरगाव कुंभळवणे, तुटवली आदी महसूली गावे आणि कामथे फौजदारवाडी, महालगूर मोरेवाडी, कातळी कामतवाडी, क्षेत्रपाळ धनगरवाडी आणि क्षेत्रपाळ कामतवाडी या १२ गावांतून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव आले आहेत. यानंतर जून २०२३च्या पहिल्या आठवड्यात चांभारगणी बुद्रुक आणि किनेश्वर या गांवांना तसेच कालवली गावातील पाटीलवाडी, पवारवाडी, भोसलेवाडी, मोहल्ला, बौध्दवाडी, विठ्ठलवाडी आणि किनेश्वर पेढावाडी आणि तुटवली

गळतीची वाडी, धामणदिवी भरणेची वाडी, महालगूर मोरेवाडी, बोरावळे कोडबेकोंड, वडघर पेढावाडी, वडघर सणसवाडी,वडघर फौजदारवाडी, नावाळे शेदवाडी, कातळी दत्तवाडी, आडावळे खडकवाडी, बोरघर महादेवाचा मुरा, कोतवाल खुर्द बागवाडी, रेववाडी, बेलाची वाडी, भोगाव पार्टेवाडी, साखर रिंगेवाडी, कापडे खुर्द राखीचा टोक, क्षेत्रपाळ आमलेवाडी, क्षेत्रपाळ धनगर वाडी, तुटवली धनगरवाडी या १२ गांवे आणि ३० वाड्यांतील एकूण ४ हजार ७२१ लोकसंख्येला आणि एक हजार ३८२ पशूधनासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे.रानबाजिरे एमआयडीसीच्या धरणातील पाणी टँकरद्वारे पुरवठयासाठी उपलब्ध होत नसल्याने यंदा लोहारे येथील बागडे फार्महाऊस येथे पाण्याचे खासगी अधिग्रहण करण्यात येऊन टँकर भरून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती पोलादपूर पंचायत समितीचे अभियंता कांबळे यांनी दिली.

पान १ वरुन

रायगडाच्या पायथ्याशी दरड

दुकानावर देखील भली मोठी दगड आल्याने दुकानाचे देखील मोठे नुकसान झाले आहे किल्ले रायगडावर सहा जूनच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी प्रचंड गर्दी होती. तत्पूर्वी या राज्याभिषेक सोहळ्यासाठी आलेला एक तरुण देखील गडावर आलेल्या दरडीमध्ये सापडून मृत्युमुखी पडल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच किल्ले रायगडच्या पायथ्याशी अशीच दरड आल्याने भीती व्यक्त केली जात आहे. उंच कड्याचे दगड उन्हामध्ये तापल्यानंतर पडलेल्या पावसात तत्काळ सुटून खाली येतात असे येथील स्थानिक ग्रामस्थ अमर सावंत यांनी सांगितले.

टॅकर पेटला

रस्ता देखील आगीची भक्ष्यस्थानी गेला होता. सुदैवाने या आगीत इतर कोणतेही वाहन भक्ष्यस्थानी आले नाही त्यामुळे मोठा अपघात टळला आहे. मात्र तरीही या भीषण अपघातात ४ जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. या सोबत दोनजण या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. या जखमी रूग्णांचा आता नजीकच्या पवना रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती तत्काळ अग्निशमन दल आणि बचाव पथकाला देण्यात आली आहे. या माहितीनंतर अग्निशमन दल आणि बचाव पथकाकडून युद्धपातळीवर आग विझवण्याचे प्रयत्न करत आहेत.

२५६ इमारती धोकादायक

होण्यास सांगण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी निर्देशानंतरही खालापूर, श्रीवर्धन आणि पाली नगर पालिका आणि नगरपंचायतीनी अद्याप आपले अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर केलेले नाहीत. या नगरपंचायतींनी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करणे, तसेच तेथील रहिवाश्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होण्याच्या सूचना देणे गरजेचे आहे.

राज्य सरकारने दूध दर कपात त्वरित मागे घ्यावी - शेकाप

३८ रुपये दर मिळत होता. परिणामी सात ते दहा टक्के दुधामध्ये वाढ झाली. एका बाजूला उन्हाळ्याचे कडाका असताना दूध व दुग्धजन्य पदार्थांना मोठी मागणी आहे उन्हाळ्यामध्ये दहा टक्के दूध उत्पादनात घट होते तरीही दर कमी करणे हे तमाम शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभा केला आहे. दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याला पशुधन वाचवण्यासाठी संघर्ष करावा लागतो आहे. पशुखाद्य व अन्य बाबीचा विचार केला असता तोही खर्चिक बाब आहे. म्हणून सद्यस्थितीत दुधाचे दर कमी करणे हे शेतकऱ्याला अडचणीत आणण्यासारखी गोष्ट आहे. राज्य सरकारने ताबडतोब दूध खरेदी धोरण अवलंबले पाहिजे. दूध पावडर बटर खरेदीवर धोरण ठरवले पाहिजे. ऐन उन्हाळ्यात ही अनेक अडचणीवर मात करत शेतकऱ्याने दुग्ध व्यवसाय टिकवला. परंतु चांगले दर मिळू लागतात जर पाडण्याचे षडयंत्र रचले आहे. दूध दरामध्ये एक वाक्यता अन्य गरजेचे आहे. एक राज्य एक दूध दराचे धोरण स्वीकारले पाहिजे. राज्यात साधारणता ७० सहकारी दूध संघ, ३०० पेक्षा जास्त खाजगी दूध संघ द्वारे दररोज दोन ते सव्वा दोन कोटी लिटर दुधाचे संकलन होते. त्यातील ४० टक्के दूध दुधाची पावडर तयार करण्यासाठी, बटर व अन्य दुग्धजन्य पदार्थ तयार होतात. आठ टक्के दूध ग्राहकांना पाउचमधून विकले जाते. ही परिस्थिती महाराष्ट्र राज्याची असताना महाराष्ट्र सरकारने माझ्या शेतकऱ्याचा अंत न पाहता ताबडतोब दूध दरवाढ करून कष्टकरी शेतकरी व बळीराजाला दिलासा द्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्यासाठी दूध दरासाठी रस्त्यावरची लढावे लढावी लागेल. इशारा पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिला.

रायगडात बोगस पोलीस भरती प्रकरणी चौघांना अटक

सोलापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी आपले पथक पाठवून माहिती गोळा केली होती. या माहितीत रोहित बबन मगर, सोलापूर केशव गिरजाची मुरमुरे, नांदेड, गोविंद सुखदेव ठाणगे, बीड, अच्युत भागवत माने, बीड या चौघांनी बोगस प्रमाणपत्र देऊन शासकीय नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. अलिबाग पोलीस ठाण्यात चौघा विरोधात ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र कोणी दिले यासाठी किती रक्कम दिली याबाबत पुढील तपास अलिबाग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दत्तात्रय जाधव हे करीत आहेत.

उन्हाळा पर्यटन हंगाम जेमतेमच

आणि उन्हाळी पर्यटन असे एकूण तीन हंगाम असून जास्त दिवस पर्यटक असणारा उन्हाळी पर्यटन हंगाम. हा हंगाम जवळजवळ ७५ दिवसांचा असतो. या पर्यटन हंगामात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम नगरपालिका,खाजगी संस्था यांच्याकडून राबविल्या जातात.मे महिन्यात माथेरानचा जन्मदिवस थाटात साजरा होतो. हा जल्लोष पर्यटकांच्या साक्षीने केला जातो. त्यामुळे दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात.यावर्षी या उलट परिस्थिती आहे.१ एप्रिल ते १० जून या ७१ दिवसात फक्त एक लाख चोपन्न हजार एकशे पंचाहत्तर पर्यटकांनी माथेरानला भेट दिली.त्यामुळे दररोज सरासरी २ हजार पर्यटक माथेरान मध्ये आले.इतर वेळी किव्हा विकेंडला एक दिवसाला पाच हजार पेक्षा जास्त येतात मात्र २०२३ च्या उन्हाळी पर्यटन हंगामात पर्यटक संख्या कमी झाल्याने काही व्यापारी वर्गात नाराजी दिसून येत आहे.

गिरीश पवार, व्यावसायिक

ई रिक्षाबाबतच अहवाल

माथेरानला ई रिक्षा सुरू करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत त्यांची देखील माहिती मागवली आहे. त्यावेळी न्यायालयाने निरीक्षण नोंदविताना ई रिक्षा धावू शकत नसेल तर माथेरानच्या जंगलात वापरण्यात येणाऱ्या गाड्यांचा वापर करा याचा अर्थ न्यायालयाला येथे वाहतूक सुरू करायची का? असा प्रश्न उपस्थित केला होता. शासनाकडून सर्वोच्च न्यायालयात गेल्या दोन महिन्यात अहवाल सादर केला जात नव्हता. त्यामुळे माध्यमांमध्ये त्याबाबत शासनाच्या कारभारावर टीका केली जात होती.

मिनिट्रेन मालामाल

अमन लॉज ते माथेरान यादरम्यानच्या शटल सेवेसह एक लाख ३१ हजार ४८१ प्रवाशांनी टॉय ट्रेन सुविधेचा लाभ घेतला. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या १७ टक्क्यांनी अधिक आहे. या कालावधीत टॉय ट्रेनने एक कोटी एक लाख २८ हजार ४२४ रुपये एवढे उत्पन्न कमावले. माथेरानमध्ये अनेक पर्यटक फक्त मिनी ट्रेन सफारी साठी येत असतात परंतु ह्यावेळी रेल्वे प्रशासनाने अचानक तातडीने १० जून पासूनच नेरळ माथेरान सेवा बंद केली आहे त्यामुळे अनेक पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. स्व. श्रीमती कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग

बनावट आधारकार्ड

त्याच्या शोधात होते. पोलीसांच्या भितीने तो गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईमध्ये लपून राहत होता. त्याने अनेक वेळा मोबाईलदेखील बंद करून ठेवले होते. त्यामुळे पोलीसांना त्याची माहिती मिळत नव्हती. अखेर पोलीसांनी वेगवेगळ्या माध्यमातून शहानवाजचा शोध युध्द पातळीवर सुरू केला. रायगड जिल्ह्यातील अलिबाग या ठिकाणी तो गेला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीसांनी मोबाईल लोकेशनच्या अधारे शोध घेतला, असता, अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या एका कॉटेजमध्ये असल्याची माहिती खात्रीशीर सुत्राकडून पोलिसांना मिळाली. अलिबाग पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय जाधव यांच्यासह त्यांचे कर्मचारी तसेच मुंब्रा पोलीसांनी संयुक्तरित्या रविवारी सकाळी शहरातील एबी कॉटेजमध्ये छापा टाकला. या छाप्यात तो एका खोलीत असल्याचे दिसून आला. शहानवाज हा शनिवारी दुपारी अलिबागमध्ये आला होता. एबी कॉटेजमध्ये नोंदणी करताना त्याने ओळखपत्र म्हणून आधारकार्ड दाखविले. मात्र ते आधारकार्ड दिल्ली येथील असून बनावट असल्याचे व चुकीचे नावाने राहत असल्याची माहिती पोलिसांकडून उपलब्ध झाली आहे.

शब्दकोडे क्र.१५२

1			■	2		3	■	4	■	5	6	7	8	■	9
	■	■	10		■	11			■	12				■	
13	14	■		■	15		■	■	16		■	17		18	
■	19			■	20		21	■	22			■	■		■
23		■	■	24		■	25	26		■	■	27		■	28
29		■	30		■	■	31		■	32	33		■	34	
	■	35				■	■	36				■	37		
■	38			■	■	39	40		■		■	41		■	
42	■	43		44	45	■		■	46		47	■	48	49	
50	51		■	52		53	■	54		■		■	55		■
■		■	56		■	57	58		■	59			■		■
60		61		■	62			■	63			■	64	■	65
	■		■	66		■		■	67		■	68			
69	70		■	■	71	72		■		■	73			■	
■		■	74		■		■	75	■	76		■	77	78	■
79				■	80			■	81				■	82	

आडवे शब्द : १.उजेड च्या विरूध्द,काळोख२.दारू पिणारा हिंदीत५.येणे,दाखल होणे१०.गेलेंला११.वेगळेपणा,भिन्नपणा१२. संगीतातील सात स्वर१३.बस्तान१५.एक रास१६.लहान मुलांचा मुका,वडिलांना हाक मारावयाचालहान मुलांचा एक शब्द१७.युध्दात तोफ वाहुन नेणारा मोठा गाडा१९.ग्रामीण रे२०.मराठयातील एक उपजातीचा प्रकार२२.हिंदीत शपथ२३.नंतर,काही वेळाने२४.झाडाला पिकलेले फळ२५. अंगावर घाम आल्याने तयार होणारा फोड२७.एक सुक्या मेव्यातील फळ २९.त्रास३०.महसुल,जकात३१.बड उलटे करा३२.सासुचा नवरा३४.साठ मिनीटांचा काळ३५.उपासना,अर्चना३६.नेहमी सागराने प्रवास करणारा धाडसी३७.मातीच्या भांडयाचा तुकडा३८.पागल,वेडा३९.एकटा,सडा४१. खोगीर४३.मतदान करणारा४६.ओहोटी विरूध्द४८.विज,विदयुत,सनी देओल-मिनाक्षी चा एक चित्रपट५०.शिजवलेली दाळ५२.शिवसेनेच्या झेंडयाचा रंग५४.कविता,कवन५५.दमयंतीचा प्रियकर५६.पळसाला पाने -- ५७.नाही म्हणने५९.खेटुन,जवळच६०.श्वापद,चार पायाचा प्राणी६२.भारतातील संपुर्ण सुशिक्षीत एक घटक राज्य६३.अंजन,डोळयात घालावयाचे मलम६६.हिंदीत शव,प्रेत६७.थोडासा,अल्पसा६८. लयबध्द,तालासुरात६९.सांभाळ,पालन७१.चावट७३.रानटी कबुतर७४.बहीणीचा मुलगा७५.स्वत:७६.भिंतीवर सरपटणारा एक प्राणी७७.देव,ईश्वर७९.हिवाळयात कानाला गुंडाळावयाचे एक उबदार वस्त्र ८०.दमा किंवा एक श्वास रोग इंग्रजीत८१.तारतंत्र नसलेला कारभार,गचाळ व्यवस्था असलेलाकारभार८२.सरळ,व्यवस्थीत,तडक

उभे शब्द:१.कयास,अनुमान२.शंभर,शतक३.रावणाचा एक बंधु४. वेल५.आजुबाजुला,परिसरात६.फळातील मगज७.एक प्राणी,सुसर८. वंदन,नमस्कार९.पालीच्या जातीचा एक झाडावर फिरणारा प्राणी१०. तृण१४.थकवा ग्लानी१५.नाकातील वाळलेला शेंबुड१६.फुलाची एक दल १८.गोमाता,कामधेनु२१.खराबी,नादुरूस्ती२३.हिंदीत मासा२४. शिकार,सावज२६.काम केल्याबददल मिळणारा पैसा२७.तुरूंग२८. प्रभाकर,भास्कर,सूर्य३०.नवलपुर्ण कामगीरी३२.धनको,व्याजाने पैसे देणारा धनीक३३.पडसे३४.ज्वर,अंगातील उस्णता३५.हल्ला,हमला बोलणे३७.कुळ,वंश४०.कविता करणारा४२.चतकोर४४.मोठी सुई ४५.मस्ती,गुर्मी४६.मोठया प्रमाणात,महा४७.'---- घ्या आणि गोड गोड बोला'४९.भेट,मिलाप,संगम५१.जीभ,जिव्हा५३.माकड,कपी५४. कारक,कर्ता५६.बाण,शर५८.हरणाच्या जातीचा एक प्राणी५९. लाजणारा,लाजाळु६०.गलबत,नाव६१.चाल,वागणुक,आचरण ६२.'--- माधवा तुझ्यानामात रे गोडवा'एक मराठी भक्तीगीत६३. एक स्वयंप्रकाशीत किटक६४.मिठाई बनवणारा६५.प्रमाणीत करून दाखविणे,सिध्द करण्याची क्रिया६८.टपालाने तातडीने संदेश पाठवण्याची एक पध्दत७०.बाजु,पक्ष,कड७२.तीसरा७३.उपडा,उकीडवा७४.ओझे,वजन ७६.जे आडवे तेच उभे७८.एक ग्रह,हा मागे लागला म्हणजे साडेसाती सुरू होते

शब्दकोडे क्र.१५१ चे उत्तर

आडवे उत्तर

१.हरभरा ४.तारामती ७.उंदीर ९.लाग ११.रव १२.जीवन १३.नाव १७.दारू १८.गन २०.कोय २१.रजक २२.भालदार २३.गमक२५. आवा २६.रकम २९.बाळ ३०.शिवसैनिक ३३.मासा ३४.देवकी३६. साळ ३७.हासरा ४०.वग ४१.ईन ४२.वैमानिक ४३.कारस्थान४५. नशा ४६.सासरा ४८.लसुण ५०.मान्यता ५१.रात्र ५२.भाकर५४.सावज ५६.नागमणी ५८.अजगर ६१.वाट ६२.सजा ६४.मर ६५.तीर६७.दफन ६८.नग ६९.काम ७०.नरम ७१.निरक्षर ७४.मदार ७५.कण७६.कात ७७.नागमोडी ८१.सनम ८३.विमान ८४.गरोदर८५.कोठार

उभे उत्तर

१.हर हर महादेव २.रव ३.राजीव ४.तान ५.मगरूय ६.तीर ८.दिल्ली १०.गवगवा १४.मग १५.सय १६.नाक १७.दादा १९.नगर २०.कोकम २२.भात २४.मकबरा २५.आरसा २६.जाळ २७.हानी २९.बाकी ३०. शिळ ३१.सैरावैरा ३२.कहाणी ३५.वग ३६.सान ३८.सकल ३९.मीन ४१.ईशान्य ४३.कान ४४.स्थानीक ४५.नमाज ४७.सहगमन ४९. विसावा ५१.राणी ५२.भार ५३.रमारमण ५५.वट ५७.मरगळ ५८.अहमदाबाद ५९.जम ६०.गती ६२.सफरनामा ६३.जान ६५.सकाम ६६.तीरकमठा ६७.दक्ष ७१.निकाल ७२.रत

निवडक

दप्तराचे ओझे होणार हलके

नवी मुंबई : विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी एकात्मिक आणि द्विभाषिक पुस्तकांमध्ये बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वापराव्या लागणाऱ्या वह्यांचे ओझे कमी होणार असून, पुस्तकांमध्येच वह्यांची पाने जोडली गेल्याने शाळेत वही नेण्याची गरज भासणार नसल्यामुळे पाठीवरील ओझे कमी होऊन विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. शासनाच्या या निर्णयाचे पालकांमधूनही स्वागत करण्यात येत आहे.

नागरिकांना नाहक भुर्दंड

पनवेल : पावसाने अजूनही हजेरी लावली नसल्याने एकीकडे पनवेल परिसरात पाणीटंचाईसदृश्य परिस्थिती आहे. अशातच गेल्या तीन दिवसांपासून खारघर शहरात गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे; तर तळोजामध्ये अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या तीन दिवसांपासून गढूळ पाणी येत असल्याने अनेकांना विकतचे पाणी घ्यावे लागत आहे.

नाका कामगार तेजीत

खोपोली : मागील दोन-तीन दिवसांपासून खोपोली-खालापूर परिसरात ढगाळ वातावरण असल्याचे पाहायला मिळत आहे. हवामान विभागाकडूनही मान्सून सक्रिय होत असल्याचे वर्तवले जात आहे. या पार्श्वभूमीवर परिसरात मान्सूनपूर्व कामांची लगबग सुरू झाली आहे. ही कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी नाका कामगारांची मागणी वाढल्याने खोपोलीत सध्या नाका कामगारांना सुगीचे दिवस आले आहेत. कमीत कमी पाचशे रुपये हजेरीप्रमाणे खोपोलीत नाका कामगार उपलब्ध होत आहेत.

वाहतूक कोंडीची समस्या

नवी मुंबई : राजीव गांधी पूल हा नेरूळ पूर्व पश्चिम बाजूला जोडणारा मार्ग आहे. त्यामुळे येथील रस्त्यांवर नेहमी वर्दळ असते. पामबीच मार्ग, तसेच नेरूळ स्थानकाकडे येथून पालिकेच्या बसेसची नेहमी वर्दळ असते. याच मार्गावर अनेक हॉटेल्स, दुकाने असल्यामुळे येथील रस्त्यावर व पदपथांवर वाहने उभी केली जातात. यामुळे येथे वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे. त्यातच अरुंद रस्त्यामुळे आणि अनधिकृत पार्किंगमुळे एनएमएमटी बसचालकांना कसरत करून येथून बस न्यावी लागत आहे.

भूखंड हडपप्रकरणी गुन्हा

नवी मुंबई : मृत व्यक्तीच्या जागी बोगस व्यक्तीला उभे करून ७० लाखांचा एमआयडीसीचा भूखंड हडप करण्याचा प्रकार नवी मुंबईत उघडकीस आला आहे. सानपाडा गावात राहणारे मुरलीधर कृष्णा भोईर यांचा ऑगस्ट १९९५ मध्ये मृत्यू झालेला असताना नेरूळमध्ये राहणाऱ्या अजय निमगुळकर याने नोव्हेंबर १९९६ मध्ये मृत भोईर यांच्या जागी बोगस व्यक्तीला उभे करुन त्यांच्या खोट्या सह्या करत भूखंड परस्पर बळकावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अतिक्रमणात मैदानच गिळंकृत

ग्रामस्थांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

येथील जमिनीच्या किमती गगनाला भिडत असताना, रेवदंडा समुद्रकिनारी शासकीय जागेत असणारे मैदान अतिक्रमणाच्या कचाट्यात सापडले आहे. खेळाच्या मैदानासाठी आरक्षित करण्यात आलेल्या मैदानावर बेकायदेशीरपणे कुंपण टाकून करण्यात आलेले अतिक्रमण उद्ध्वस्त करण्यात आले होते. परंतु, काही तासातच पुन्हा मुजोरी करीत त्या जागेवर ताबा मिळवून कुंपण घातले आहे. ते अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी तक्रार जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

रेवदंडा मोठे बंदर येथे समुद्रालगत पूर्वीचे २५४ व सध्याचे बदलेले नवीन १८५ सर्वे नंबरमधील मलई क्षेत्र म्हणून असलेली जागा गुरे चरण्यासाठी व तसेच स्थानिक मुले खेळाचे मैदान म्हणून वापर असत. या जागेत मुजोरीने अतिक्रमण करण्यात येऊन बेकायदेशीर कुंपण बांधून ताबा कब्जा निर्माण केला आहे. यामुळे येथील स्थानिक मुलांचे खेळण्याचे मैदान हरवले व गुराढोरांना चरण्यासाठी जागा नसल्याने मोठी समस्या निर्माण झाली. याबाबत मोठे बंदर ग्रामस्थांनी एकत्रित येऊन जिल्हाधिकारी, अलिबाग प्रांताधिकारी व अलिबाग तहसीलदार, रेवदंडा तलाठी, रेवदंडा ग्रामपंचायत यांना दिले होते. चक्क मुलांचे क्रिकेट खेळण्याचे मैदान या अतिक्रमणाने गिळंकृत करण्यात आले. या मुजोरीने स्थानिक मोठे बंदर ग्रामस्थांनी संप्तत प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. या जागेवर मुजोरीने अतिक्रण केल्याने स्थानिक मुलांनी खेळायचे कुठे, तसेच येथील गुरेढोरे चरण्यासाठी कुठे सोडायची, हा सवाल स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

रेवदंडा मोठे बंदर ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रार निवेदन अर्जाची शासकीय दरबारी दखल घेण्यात आली, तसेच या जागेतील बेकायदेशीर कुंपण हटवून अतिक्रमण हटविण्यात आले, शासनाची कारवाई असूनसुद्धा मुजोरीने अतिक्रमण करण्याच्या विरोधात शासकीय कामात अडथळा निर्माण केला म्हणून शासनाच्या वतीने कायदेशीर गुन्हा मुजोरीने अतिक्रमण करणाऱ्यांवर करण्यात दाखल करावा तसेच रेवदंडा मोठे बंदर परिसरात नव्याने अतिक्रमण करण्यात आले असून, बेकायदेशीरपणे सरकारी जागेत ताबा कब्जा निर्माण केला आहे हे सर्व शासनाने धडक कारवाई राबवित हटविण्यात यावे, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

याबाबत रेवदंडा महसूल विभागाचे तलाठी शिंधे यांच्याशी संपर्क केला असता, रेवदंडा मोठे बंदर ग्रामस्थांचे पुनस्यः अतिक्रमणाबाबतचे व बेकायदेशी कुंपण हटविण्याबाबत अर्ज वरिष्ठांकडूनसुद्धा प्राप्त झाले आहे. त्यानुसार येत्या दोन दिवसात सदर जागेत पुनस्यः कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

अतिक्रमण तात्काळ हटवा

तक्रार निवेदन अर्जाची दखल घेण्यात येऊन शासनाच्या वतीने रेवदंडा तलाठी, रेवदंडा ग्रामपंचायत ग्रामसेवकांच्या उपस्थितीत शासकीय यंत्रणा राबवित हे बेकायशीर अतिक्रमण हटविण्यात आले. परंतु, काही तासातच मुजोरीने पुनश्च अतिक्रमण करून बेकायशीरपणे ताबा कब्जा करण्यात आला. याबाबत रेवदंडा मोठे बंदर ग्रामस्थांनी संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करून बेकायदेशीर अतिक्रमण तातडीने हटविण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, रेवदंडा ग्रामपंचायत व तलाठी रेवदंडा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तळा तालुक्यात भीषण पाणीटंचाई

'जलजीवन' योजना कागदावरच

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील पाणी योजना या तालुका निर्मितीपासून होत असल्या तरी करोडो रुपये खर्च करून आजतागायत मुबलक पाणी येथील नागरिकांना मिळू शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. गावागावात केंद्र पुरस्कृत जलजीवन मिशन या योजनासुद्धा राबवित असताना घरोघरी नळ आले खरे; पण काही गावातील नळपाणी पुरवठा योजना अनेक कारणांमुळे नागरिकांना पाणी मुबलक देण्यात आधीच अयशस्वी ठरल्याने तळा तालुक्यातील अनेक गावांना पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत.

जलजीवन मिशन योजनेच्या कामामध्ये ज्या गावासाठी जे काम आवश्यक आहे, अशा कामांचा सर्वे न होता अनावश्यक कामाचा सर्वे झाल्याने लोकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सर्वे करताना गावकरी बांधवांना विश्वासात न घेता अशा मंजूर झालेल्या कामांचा जनतेला काय उपयोग होईल, हे सांगणे कठीण आहे. अनेक गावांमध्ये या योजनेंतर्गत दरडोई ५५ लीटर पाणी मिळत नसल्याने महिलांना फार मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

ज्या गावात नळपाणी पुरवठा योजनेत ज्या अडचणी होत्या त्या दूर न झाल्याने पाणी मुबलक कसे मिळणार हा मोठा प्रश्न आहे. शासनाच्या सर्वेप्रमाणे इस्टेमेंट तयार झाले. ऑनलाईन निविदा भरल्या गेल्या आणि ठेकेदार इस्टेमेंटप्रमाणे काम करत आहेत आणि बिलेसुद्धा काढत आहेत. पण नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न तिथेच राहील अशी भिती जनतेतुन व्यक्त होत आहे. या तालुक्यात सुरु असलेली कामे एकाच ठेकेदारांनी अनेक योजना घेतल्याने ही कामे वेळेत होणार नाहीत. २० मे २०२३ ही मुदत संपली तरीही कामे नावाला सुरू करुन ठेकेदार ढुंकूनही पहायला येत नाही अशाही बाबी पुढे येत असून ही मोठी शोकांतिका आहे.

बॉम्बे डाईंगकंपनीतर्फे कार्यक्रम

। आपटा । वार्ताहर ।

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे मोहोपाडा वसाहतीत रविवार, दि. ११ जून रोजी 'प्लास्टिक प्रदूषणावर मात' या विषयावर जागरूकता वाढविण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांतर्गत सकाळी विद्यार्थ्यांसाठी चित्रकला आणि निबंध लेखन (विषय - प्लास्टिक प्रदूषणावर मात) याचे आयोजन केले गेले. त्यामध्ये शाखा पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

संध्याकाळी कंपनी वसाहतीमध्ये राहणारे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारांच्या हस्ते वेगवेगळ्या प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यामध्ये कंपनीचे उपाध्यक्ष भागबान कार, महाप्रबंधक बी.पी मिश्रा, सुभाष खुंटिया आणि कंपनीच्या पर्यावरण विभागाचे पदाधिकारी अतुल मोरे, निलेश जाधव, स्वामिनाथ गुप्ता, नंदू हडप आणि पंकज दवे यांचे सहकार्य लाभले.

सरकारने वारकऱ्यांची माफी मागावी : घरत

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

आळंदीहून पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना वारकऱ्यांना पोलिसांनी लाठीमार केल्याचा व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाला आहे. आम आदमी पार्टीने याचा तीव्र शब्दात निषेध केला असून यासंदर्भात सरकारने वारकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणी आम आदमी पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष मनोज घरत यांनी केली आहे. आम आदमी पार्टी या लाठीमाराचा निषेध करीत असून, यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी वारकरी संप्रदायाची सपशेल माफी मागावी, अशी मागणी घरत यांनी केली आहे.

ब्रह्मचैतन्य संगीत सभेत अक्षय वर्धावे यांचे गायन

। पनवेल । प्रतिनिधी ।

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे १९ वे पुष्प पनवेल येथे संपन्न झाले. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात कर्जत येथील अक्षय वर्धावे यानी गायनसेवा केली. 'श्री' या रागाने त्यानी संगीत सभेचा प्रारंभ केला. त्यानंतर त्यांनी राग 'गौडमल्हार' सादर केला. नंतर 'अवधुता' हे निर्गुणी भजन व 'सावरे अईजैईयो' सादर करून प्रेक्षकांची प्रशंसा प्राप्त केली.

'ज्ञानियांचा राजा' हा अभंग सादर करून 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा' या कन्नड भजनाने आपल्या गायन सेवेची सांगता केली. त्यांना ऋतुजा कर्वे-कुंटे यांनी संवादिनी व निषाद चिंचोले यांनी तबला साथ केली.

पं. अरुण कशाळकर व पं. सुहास महाजन यांचे शिष्य असलेल्या अक्षय वर्धावे यांनी श्री कृती स्कूल ऑफ म्युझिक, हस्टन (टेक्सास), यूएसए येथे मविभागप्रमुखफ म्हणून काम केले आहे. तसेच यूएसए साठी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या ५ परीक्षांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. 'पंतप्रधान इच्छुक लेखक योजना' येथे त्यांनी सादर केलेला भारतीय संस्कृतीतील ओंकार रहस्य या विषयावरील प्रबंध प्रमाणित करण्यात आला आहे.

शालेय वस्तू खरेदीसाठी लगबग

वाढत्या महागाईमुळे पालकांच्या खिशाला कात्री

। तळा । वार्ताहर ।

तळा बाजारपेठेत शालोपयोगी वस्तू बाजारात दाखल झाल्या असून, विद्यार्थी व त्यांच्या पालकांची वस्तू खरेदीसाठी रेलचेल सुरू झाल्याचे पहावयास मिळत आहे.

सर्व शाळा १५ जूनला सुरू होणार असल्याने बाजारपेठेत वह्या, दप्तर, टिफीन, रेनकोट, छत्र्या, बुट, चप्पल, कमरपट्टे, पेन, कंपासपेटी व इतर साहित्य दुकानदारांनी विक्रीस आणले आहे. मात्र, यावर्षी मागील वर्षापेक्षा यावर्षी किंमती वाढल्याचे दिसत आहे. तरीही ग्राहक, विद्यार्थी पालक बाजारात वस्तू खरेदीसाठी सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे दिसत आहे. तसेच नागरिकही पावसाळपूर्व छत्र्या, मेनकापड, रेनकोट इत्यादी साहित्य खरेदी करताना पहावयास मिळत आहेत. मात्र, यावर्षी सर्वच वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ झाल्याने पालकांना अधिकचा आर्थिक फटका बसला आहे.

बाजारात कटवही २०० पेजेस ४२० रूपये डझन, फुलसाईझ २०० पानी वही एक डझन ४८० रूपये, तर छत्रीचे भाव २०० रूपयांपासून पुढे ५०० पर्यंत, टीफीन डबा प्लास्टिक ४० रूपयापासून १५० दरम्यान तसेच स्टील डब्बे १५० ते २५० दरम्यान, वॉटर बॅग ४० ते १०० पर्यंत व स्टील २०० ते ४०० दरम्यान, रेणकोट १००, ते ५०० च्या दरम्यान या प्रमाणे वस्तूंचे सध्या बाजारात भाव आहेत.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **घरकामासाठी रहिवासी स्वरूपाची** चांगणे जेवण बनवणारी बाई हवी आहे. ९४२१९५४३४८- (१०,०००)
- **लग्न मुहूर्ताला येणाऱ्या पाहुण्यांसाठी**, ग्रुप बुकिंगवर, हॉटेल रुम देणे आहे. भेटा नवीन हॉटेल 'द बनयन शेल्टर्स' चोंढी, मांडवा रोड. ९८५०४२७७२८, ९८२२२५७९२९
- **PICK UP/407 टेम्पोवर अनुभवी** २ ड्रायव्हर मांडवा येथे हवे आहेत. १५०००/- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- **अलिबागमध्ये ऑफिस** कामाकरीता मुलगा पाहिजे १० वी पास. पगार ५०००-७००० मो.९९२३२३५०५६/९८२२४६१७६१
- **वायशेत येथे रोडटच** दुकान गाळे भाड्याने देणे आहेत. एच पी गॅस कं. उसर च्या पुढे २० गुंठे शेतजमिन विकणे आहे. ९४२११७०३५७
- **Vacancy for office staff for** office in Alibag Graduate candidates can apply. For interview call 9923750549
- **महान डेपो-रामराज येथे** वाडीत काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. संपर्क - ९८२२००१८५३
- **मशिनरीच्या दुकानात प्लंबर,** मेकॅनिक, वायरमन व हेल्पर पाहिजेत. संपर्क- मारूती नाका, अलिबाग, ९८२२००१८५३
- **अलिबागमध्ये लेडीज पार्लर** कामासाठी अनुभवी मुली पाहिजेत वेळ ११ ते ८ मो. ८१४९८६५६२५
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरिता** ऑटोकॅड ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क : ९४२२०९४१५१/९२७०८२७८२९
- **श्री.सिद्धीविनायक ज्योतिष,** सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं.९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

ब्राह्मण संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

। आपटा । वार्ताहर ।

रसायनी ब्राह्मण संघातर्फे यंदाही मागील वर्षाप्रमाणे दहावी व बारावीत यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सोमवार, दि. १२ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता गणपती मंदिर मोहोपाडा येथे आयोजित केला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पळणीटकर, डॉ. सौ. पळणीटकर,डॉ. विदुला सोमण, रसायनी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष बी.एस. कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये दहावी उत्तीर्ण मीरा बर्वे, रोहित गांगल, प्रथमेश दातार, प्रद्योत म्हैसकर, बादल राज विनोद. तर, बारावीत उत्तीर्ण केदार जोशी, मल्हार बापट, चिन्मय दीक्षित आणि सुचेता धनंजय जोशी यांचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या कुलकर्णी यांनी केले, तर आभार डॉ. कुलकर्णी यांनी मानले. यावेळी परिसरातील ब्राह्मण संघाचे सर्व सदस्य व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

धूळवाफे पेरणीला शेतकऱ्यांची पसंती

तळा : तालुक्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक धूळवाफेच्या पेरण्या सुरू केल्या आहेत. पावसाआधी पेरण्या केल्यास भात, नागली, वरी हे पीक दर्जेदार येत असल्याची शेतकऱ्यांची धारणा आहे. पिकाच्या उगवणीसाठी वळवाचा पाऊस फायदेशीर ठरत असून, कोंब येतात आणि हिरवी रोपे दिसू लागल्याने मोठ्या पावसात ती तग धरतात, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

तालुक्यात धूळवाफेच्या पेरणीला महत्त्व आहे. पाऊस झाल्यावर पेरणी केल्यास बीज उगवणीत अडचणी येत असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे पूर्वापार धूळवाफेच्या पेरणीला आजही पसंती दिली जात आहेत.

दहावीच्या विद्यार्थ्यांचा सन्मान

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील मुठवली खु. गावचे सुपुत्र तथा युवा सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर यांच्या वतीने दहावी पास विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यामध्ये मुठवली खु., गावठाण व सांगडे या तीन गावांतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

दरम्यान, ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रकमेची पारितोषिकेही देण्यात आली. महेश तुपकर यांनी गतवर्षी संपन्न झालेल्या एका शैक्षणिक कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार हा सत्कार करण्यात आला आहे. यावेळी चिंतामणी कदम, दत्ता सानप, विठोबा भोकटे, तुषार मालुसरे, प्रभाकर दळवी, नरेश दळवी, रवींद्र कदम, अभिषेक सानप, रवींद्र तेलंगे, सूरज कदम आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

पळसदरी ग्रामस्थांपुढे कल्पतरू प्रशासन नमले

। नेरळ। प्रतिनिधी ।

पळसदरीमधील कल्पतरू या बांधकाम व्यावसायिक कंपनीकडून स्थानिक ग्रामस्थ यांना रोजगार उपलबध नसल्याने नांगुर्ले ग्रामस्थांनी सलग दोनदा उपोषण केले. त्यानंतर शासकीय प्रशासनाच्या दबावामुळे कल्पतरू प्रशासन नमले असून, तहसील कार्यालयात आज कल्पतरू प्रशासन आणि उपोषणकर्ते यांच्यातील चर्चा सकारात्मक झाली आहे.

कल्पतरू बांधकाम व्यावसायिक कंपनी कडून तब्बल १५० एकर जमिनीवर गृहसंकुले बांधली जाणार आहेत. मात्र, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामस्थांना अद्याप प्रयत्न कोणताही रोजगार देण्यात आले नाही. त्यामुळे मे २०२३ ग्रामस्थांनी उपोषण केले होते. तीन दिवसांनंतर उपोषण सोडताना २२ जून रोजी कल्पतरू प्रशासन यांच्याशी चर्चा ठरली होती. कल्पतरू प्रशासनाकडून त्या बैठकीला कोणीही उपस्थित राहिले नाही आणि त्यामुळे अखेर ती नाही. त्यामुळे ५ जूनपासून नांगुर्ले ग्रामस्थांनी कर्जत तहसील कार्यालयाच्या बाहेर उपोषण सुरु केले होते. त्यावेळी नांगुर्ले ग्रामस्थांचे उपोषण चौथ्या दिवशी स्थगित झाले. तहसीलदार आणि प्रांत अधिकारी तसेच पोलीस अधिकारी यांच्या पुढाकाराने स्थगित झालेल्या उपोषणाच्या वेळी ठरल्याप्रमाणे सोमवारी १२ जून रोजी कर्जत तहसील कार्यालयाबाहेर उपोषणकर्ते आणि कल्पतरू प्रशासन यांच्या कर्जत तहसील कार्यालयात बैठक झाली.

बैठकीला विनोद साबळे, कैलास मोरे, राजेंद्र निगुडकर हे उपोषणकर्ते यांच्यासह कल्पतरु प्रशासनाचे अमोल मथुरे, तसेच कंपनीचे अधिकारी, महसूल प्रशासन, पोलीस अधिकारी के.डी. कोल्हे यांच्या उपस्थित सकारात्मक चर्चा झाली. यावेळी ग्रामस्थ नांगुर्ले गावातील उपोषणकर्ते कैलाश महाले, अजित पवार यांच्यासह गावातील पवार, म्हामले, धामणसे, कदम, हुमणे, शिंदे, लाड, देशमुख, भिलारे, मालुसरे, चव्हाण, मोरे या कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते.

शिरगाव साई मंदिराचा वर्धापन दिन

। चिरनेर । वार्ताहर।

शिरगाव येथील प्रतीशिर्डी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साई बाबा मंदिराचा २१ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शिरगाव येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

वर्धापन दिनास धर्मादाय आयुक्त बुके, जंत्रे, आळंदी साई देवस्थानचे अध्यक्ष सुभाष निलगे. भजनी मंडळींनी भजन रुपी सेवा अर्पण केली. मंदिराचा गाभारा फुलांनी सजविण्यात आला होता. साईबाबांच्या मंदिराचा वर्धापन दिन सोहळा यशस्वी करण्यासाठी विश्वस्त रवी जाधव, विभावरी जाधव, मंदिराचे व्यवस्थापक अनिल देवकर, राकेश मुगळे, विजय लोखंडे, रमेश फरताडे, संतोष चव्हाण, मच्छिंद्र कापरे, लक्ष्मीकांत ठाकुरद्वारे, विष्णू कदम, गणेश कपिले, अर्जुन दहिभाते, सिद्धाजी माने, विजय हुंबे, साकेत कारंजकर राधेश्याम वारे, या सर्वांनी विशेष मेहनत घेतली.



माजी नगरसेविका साईदिशा माने तसेच साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांचे स्वागत मंदिराचे मुख्य विश्वस्त तथा माजी आमदार प्रकाश देवळे यांनी केले.

वर्धापन दिनाच्या मुख्यदिवशी सायंकाळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी मंदिरास भेट दिली यावेळी त्यांना साईबाबांची आरती करण्याचा मान देण्यात आला. याप्रसंगी केसरकर यांना साईबाबांची मूर्ती देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. देवळे व सचिव सपना लालचंदानी यांच्या हस्ते सकाळी अभिषेक करण्यात आला.

साई भक्तांसाठी मंदिरातर्फे महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. दिवसभर अनेक

मुरुड परेशनाका येथे निवारा शेड

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुडमधील विविध विकास कामांचे लोकार्पण व उद्घाटन सोहळा नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या विविध विकास कामात शहरातील परेश नाका येथे प्रवासी थांबा उभारण्यात येऊन लोकार्पण सोहळा झाला. या निवारा शेड साठी सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांजकडे वेळोवेळी निवेदन देऊन सातत्याने पाठपुरावा केला होता अखेर या पाठपुराव्याला यश मिळाले आणि प्रवासी थांबा सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

कपिल घोरपडे पोलादपूर तहसिलदार

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर तालुक्याचे तहसिलदार म्हणून कपिल घोरपडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. कार्यालयातर्फे अज्ञज्ञाल कारकून मंगेश ढेबे, शहाजी भुजबळ, राहुल ससाणे तसेच उमेश चांदोरकर, मंडळ अधिकारी सुरेश राठोड, अजय जाधव आणि फुलचंद राठोड, महसूल सहाय्यक सिध्देश दज्ञांडे, प्रशांत अंबिलकर, परशराम पाटील तसेच तलाठी सुनील वैराळे, यशवंत तळेकर, योगेश ज्ञारडे, जया फुलवर, वंदना गिमेकर, संगिता सुदर्शने, राणी पवार आणि शिपाई साधना पार्टे, शिवाजी मोरे, पुजारी आदींनी नवीन तहसिलदार कपिल घोरपडे यांचे स्वागत केले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

नावात बदल

माझे जुने नाव कु.सविता रामचंद्र भगत असे होते. लग्नानंतर सौ.स्नेहल सुधाकर राणे असे झाले आहे. यापुढे मी सौ.स्नेहल सुधाकर राणे याच नावाने ओळखली जाईल. नोटरी नं.४३६५/२०२३ या नुसार.

सही/-
सौ.स्नेहल सुधाकर राणे

अलिबाग नगरपरिषद
जाहीर निविदा सूचना

मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग- रायगड खाली नमूद केलेल्या कामांसाठी पुरवठादाराकडून खाली नमूद केलेल्या साहित्यांचे प्रति नगाचे दर मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	इसारा रक्कम धनाकर्षाद्वारे	निविदा फॉर्म फी	निविदा फॉर्म मिळण्याचा दिनांक	सिलबंद निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ
१	स्वच्छ अलिबाग सुंदर अलिबाग या आशयाचे ॲक्रेलीक (LED)बसविणे लेटर वेल्डींग सहीत तयार करून बसविणे (३४ फुट ४ फुट) अलिबाग नगरपरिषद व स्वातंत्र्यांची ७५ वर्षे लोगोसहित	रु.५०००/-	५००/-	१४.०६.२०२३ ते २३.०६.२०२३ वेळः स. ११.०० ते सायं.४.००	२६.०६.२०२३ वेळ सकाळी ११.०० ते सायं.४.३०

सूचनाः
१) कामाबाबत अधिक माहिती निविदा फॉर्ममध्ये देण्यात आलेली असून नगरपालिका कार्यालयात आरोग्य विभागात उपलब्ध होईल.
२) देकारपत्र द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याचे असून लिफाफा नं.१ मध्ये पात्रते बाबतची कागदपत्र व लिफाफा नं.२ मध्ये वित्तीय बोलिचा फॉर्म सादर करण्याच्या आहे. दोन्ही लिफाफ्यावर नाव, लिफाफा नंबर नमूद करावा.
३) राष्ट्रीयकृत बँकांकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी.
४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व देकारपत्र स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग, नगरपरिषद

ग्रुप ग्रामपंचायत देगाव, ता. माणगाव, जि. रायगड
निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत देगाव खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	अंदाज पत्रक रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	निविदा सादर करण्याची अंतिम तारीख	वेळ	ठिकाण	१% इसारा रक्कम	कोरे निविदा फॉर्म फी
१	देंगाव ते ढाकशेळी जोडरस्ता करणे	जन सुविधा अंतर्गत सन २०२३/२४	१०.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	१००००	२००/-
२	रा.जि.प.शाळा देगाव दुरूस्ती करणे क्र.१	जिल्हा वार्षिक योजना सन सन २०२२/२३	४.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	४०००	२००/-
३	रा.जि.प.शाळा देगाव दुरूस्ती करणे क्र.२	जिल्हा वार्षिक योजना सन सन २०२२/२३	३.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	३०००	२००/-
४	रा.जि.प शाळा रिळे दुरूस्ती करणे	जिल्हा वार्षिक योजना सन सन २०२२/२३	३.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	३०००	२००/-
५	रा.जि.प शाळा पाचोळे दुरूस्ती करणे	जिल्हा वार्षिक योजना सन सन २०२२/२३	२.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	२०००	२००/-
६	देगाव येथे रस्ता तयार करणे	जिल्हा वार्षिक योजना सन सन २०२२/२३	३.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	३०००	२००/-
७	देगाववाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे	जिल्हा वार्षिक योजना सन सन २०२२/२३	३.०० लक्ष	३ महिने	२२/०६/२०२३	स.१०.०० वा.पर्यंत	ग्रा.प कार्यालय	३०००	२००/-

अटी व शर्ती :-
१) प्राप्त निविदा दि. २२-०६-२०२३ रोजी दुपारी ११.०० वाजता ग्रा.पं देगाव येथे उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांचे हस्ते उघडणेत येतील.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील. मा.उपअभियंता सो.बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स.माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी /सदस्य यांचेमार्गदर्शन व देखरेखीखालील सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) कामाचे देयकातून शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. काम अंतित्या रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत देगाव
ता. माणगाव, जि. रायगड

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत देगाव
ता. माणगाव, जि. रायगड

कोकण मर्कंटाईल को ऑप बँक लिमिटेड मल्टी स्टेट बँक
१९७३ पासून

नोंदणीकृत कार्यालय : १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टीटी, मुंबई ४०० ०१०. दूरध्वनी क्रमांक : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७०, २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११. फॅक्स : २३७४८५८९. संकेतस्थळ : www.kokanbank.net

विक्री सूचना

याद्वारे आम जनता आणि विशेषतः कर्जदार, तारणदार यांना प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून कळविण्यात येते की खालील प्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता ज्या कोकण मर्कंटाईल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत, त्यांचा ताबा २२/१२/२०२२ रोजी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ च्या तरतुदींच्या अनुसार घेण्यात आला आहे, त्यांची विक्री निविदा कम सार्वजनिक लिलावाच्या माध्यमातून खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार संरक्षित कर्ज ज्याची रक्कम रुपये २३, २७,२६० /- (६ रुपये तेवीस लाख सत्तावीस हजार दोनशे साठ) इतकी आहे, खाते क्रमांक ५०६९/ २८१६९ प्रमाणे अधिक त्यावरील व्याज ११.५० % प्रति वर्ष इतक्या दराने येणे आहे, त्याच्या वसुलीसाठी खालील प्रमाणे नमूद केलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.
मालमत्तेची विक्री ही फर्निचर आणि फीक्श्चर्स च्या शिवाय आणि जसे आहे जिथे आहे आणि जे आहे ते आहे तत्वावर / शर्तीवर करण्यात येणार आहे.

अ. क्र	नाव	मालमत्तेचा तपशील	मालमत्तेची स्थिती	राखीव किंमत	ईएमडी (रुपयांत)	पाहणीची तारीख आणि वेळ	विक्रीची तारीख आणि वेळ
	कर्जखाते क्रमांक ५०६९/ २८१६९ मध्यवर्ती कार्यालय शाखा १) श्री मुबीन हुसेन बगदादी २) श्रीमती नाझिया मुबीन बगदादी - तारणदार / कर्जदार ३) श्री अयाज अब्दुल कादर मिरजकर - शुअरिटी ४) श्रीमती शहनाझ इस्माईल शेख - शुअरिटी ५) श्री शशांक गणपत सुर्वे - शुअरिटी	सदनिका क्रमांक १०२, क्षेत्र सुमारे १००६ चौरस फूट (बिल्ट अप), १ ला मजला, एकता आर्केड, मौजे अराठी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड, घर क्रमांक ५७४/८, गट क्रमांक १८४ नोंदणी उपजिल्हा आणि जिल्हा श्रीवर्धन आणि जिल्हा रायगड	बँकेचा प्रत्यक्ष ताबा	२५,१५,०००/-	२,५१,५००/-	१०/०७/२०२३ सकाळी ११. ०० ते संध्याकाळी ४.००	२७/०७/२०२३ सकाळी ११.०० वाजता

इच्छूक खरेदीदार सदरील मालमत्तेची पाहणी वरील प्रमाणे नमूद केलेल्या तारीख आणि वेळी करू शकतात.
वरील प्रमाणे नमूद केलेल्या अचल मालमत्तांच्या संदर्भातील सविस्तर तपशील हे निम्नस्वाक्षरीकार यांना ज्ञात असलेल्या आणि माहितीच्या आधारे देण्यात आले आहेत आणि मालमत्तेच्या संदर्भात नमूद केलेल्या तपशिलाच्या संदर्भात कोणतीही चूक असल्यास त्यास निम्नस्वाक्षरीकार यांना जबाबदार धरता येणार नाही. जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती :
१) विक्री प्रक्रिया ही खालील प्रमाणे नमूद केलेल्या अटी आणि शर्तीना अधीन असेल.
२) मालमत्तेची विक्री ही फर्निचर आणि फिक्श्चरच्या शिवाय आणि जसे आहे, जिथे आहे, जे आहे ते आहे तत्वावर करण्यात येणार आहे.
३) जाहीर लिलावाच्या माध्यमांतून विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणी वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तारीख आणि वेळी करता येईल. मालमत्तेच्या पाहणीच्य संदर्भात कोणत्याही शंका असल्यास किंवा निविदा सादर करण्याच्या संदर्भात कोणत्याही शंका असल्यास कृपया प्राधिकृत अधिकारी कोकण मर्कंटाईल को ऑप बँक लिमिटेड, १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगांव टीटी, मुंबई ४०० ०१० दूरध्वनी क्रमांक : ९८२०५४७७०० / ९८२०४६४२६४ यांच्याशी संपर्क साधावा.
४) इच्छूक खरेदीदार वरील प्रमाणे नमूद केलेल्या मालमत्तांच्या लिलावाद्वारे खरेदीसाठी आपल्या बोली सीलबंद लिफाफ्यात ईएमडी रकमेच्या डीडीसह प्राधिकृत अधिकारी यांचे कार्यालय, कोकण मर्कंटाईल को ऑप बँक लिमिटेड, १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगांव टीटी, मुंबई ४०० ०१० येथे १७/०७/२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करू शकतात. सीलबंद लिफाफे प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगांव टीटी, मुंबई ४०० ०१० येथे उपलब्ध असलेले इच्छूक खरेदीदार, कर्जदार, तारणदार आणि शुअरिटीज यांच्या उपस्थितीत २७/०७/२०२३ रोजी सकाळी ११. ०० वाजता विक्रीच्या वेळी उघडण्यात येतील.
५) बोली किंवा सशर्त बोली ज्या योग्यरीत्या भरण्यात आलेल्या नाहीत किंवा अशा बोली ज्यांच्यासोबत ईएमडी सादर करण्यात आलेले नाही तसेच बोली ज्या वरील प्रमाणे नमूद केलेल्या तारीख आणि वेळेच्या नंतर प्राप्त झालेल्या आहेत, त्यांचा विचार करण्यात येणार नाही / तसेच त्या वैध मानण्यात येणार नाहीत. आणि त्या फेटाळून लावण्यात येतील. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही.
६) बोली प्रपत्रासमवेत इच्छूक बोलीदार यांनी केवायसी प्रपत्र जोडणेही आवश्यक आहे. (पॅनकार्ड आणि पत्त्याचा पुरावा)
७) कोणत्याही परिस्थितीत राखीव किमतीपेक्षा कमी रकमेला मालमत्तेची विक्री करण्यात येणार नाही.
८) सर्वोच्च बोली लावणाऱ्या बोलीदारालाच मालमत्तेची विक्री करण्यात येणार आहे मात्र संरक्षित धनको म्हणजेच कोकण मर्कंटाईल को ऑप बँक लिमिटेड यांची त्याला मान्यता असणे आवश्यक आहे. मात्र निम्नस्वाक्षरीकार यांनाही आवश्यकता वाटल्यास इंटर से बिडिंग प्रक्रियेला मान्यता देण्याचे अधिकार आहेत जी सदरील वेळी, स्थळी आणि तारखेला घेण्यात येईल.
९) लिलाव / इंटर से बिडिंग तिथेच घेण्यात येईल जेव्हा इच्छूक बोलीदार उपस्थित असतील आणि आपली बोली थेट सादर करतील आणि आपल्या बोलीच्या रकमेत वाढ करतील.
१०) सर्व ती देयके म्हणजेच महानगरपालिकेचा कर, देखभाल सोसायटी आकार, वीज बिल आणि पाणी कर, आणि अन्य अशी देयके जे सदरील मालमत्तेच्या संदर्भात आहेत ते यशस्वी बोलीदार / खरेदीदार यांनी अदा करणे आवश्यक आहे.
११) यशस्वी बोलीदार / खरेदीदार यांनी खरेदी रकमेच्या २५% रक्कम (आधीच अदा केलेली ईएमडी ऍडजेस्ट केल्यानंतर) ताबडतोब म्हणजेच प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारण्यात आल्यानंतर, कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसांत अदा करणे आवश्यक आहे अन्यथा ईएमडी रक्कम जी आधी भरणा करण्यात आली आहे, ती जप्त करण्यात येईल.
१२) विक्री रकमेच्या ७५% रक्कम, प्राधिकृत अधिकारी यांनी विक्रीला मान्यता दिल्यानंतर आणि यशस्वी बोलीदार यांची बोली स्वीकृत केल्यानंतर कामकाजाच्या १५ दिवसांत भरणा करणे आवश्यक आहे. विक्री रकमेच्या उर्वरित ७५% रक्कम किंवा तिचा काही भाग विहित कालावधीत अदा करण्यात कसूर करण्यात आल्यास भरणा केलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल आणि संरक्षित धनको यांना सदरील मालमत्तेची पुन्हा एकदा विक्री करण्याचे स्वातंत्र्य असेल आणि पूर्वीचे खरेदीदार यांचे सदरील मालमत्तेवरील सर्व ते अधिकार जप्त करण्यात येतील. तसेच संबंधित खरेदीदार यांनी या आधी भरणा केलेल्या रकमेवरील त्यांचे अधिकारही जप्त होतील.
१३) विक्री प्रक्रिया ही संरक्षित धनको यांच्या मान्यतेस अधीन राहील.
१४) वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेली अचल मालमत्ता निम्नस्वाक्षरीकार यांनी बोली स्वीकृत केल्याच्या तारखेपासून यशस्वी बोलीदार यांची जोखीम राहील आणि एखादी आगीची दुर्घटना, चोरी किंवा अन्य अपघात यांच्यामुळे संबंधित मालमत्तेची कोणतेही नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित खरेदीदार यांची राहील. सर्वोच्च बोली लावणाऱ्याला कोणत्याही स्वरूपाच्या कोणत्याही आधारावर विक्री रद्द करण्याचा अधिकार असणार नाही.
१५) कोणत्याही स्वरूपाची वैधानिक देयके ज्यात सोसायटी देयके आणि मालमत्तेच्या संदर्भातील देयकांचा समावेश आहे त्यांची अदायगी खरेदीदार यांनी करणे आवश्यक आहे तसेच मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, हस्तांतरण शुल्क, आणि अन्य शुल्क तसेच आकार जे वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील विक्री प्रमाणपत्र नोंद करण्याच्या संदर्भात आहेत ते यशस्वी बोलीदार यांनी अदा करणे आवश्यक आहे.
१६) इच्छूक बोलीदार / निविदादार स्वतः किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले प्राधिकृत प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस लिलाव / विक्री प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही.
१७) येणे असलेली रक्कम, तसेच त्यावरील शुल्क आणि अन्य आकार जे संरक्षित धनको यांनी अदा केलेले आहेत ते वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / सह कर्जदार यांनी लिलावाच्या तारखेच्या पूर्वी एक दिवस भरणा केल्यास मालमत्तेची विक्री केली जाणार नाही आणि मालमत्तेच्या विक्रीसाठी संबंधित बोलीदारांकडून प्राप्त झालेल्या बोली त्यांना परत करण्यात येतील आणि त्या संदर्भात कोकण मर्कंटाईल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांची जबाबदारी असणार नाही.

सरफेस कायदा २००२ चा नियम ८(६) अनुसार ३० दिवसांची वैधानिक सूचना
कर्जदार, तारणदार आणि हमीदार यांना याद्वारे अधिसूचित करण्यात येते की त्यांनी वरील प्रमाणे नमूद केलेली रक्कम आणि तत्संबंधी खर्च आज पासून ३० दिवसांत अदा करावेत अन्यथा मालमत्तांची विक्री करण्यात येईल आणि काही रक्कम शिल्लक राहिल्यास त्याची वसुली व्याज आणि शुल्कासह करण्यात येईल.

जाहीर नोटीस

[illegible]

[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत व त्यामधील घर मिळकत अशी असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. गौरी भरतन रा. गोंधळपाडा, शाहूनगर, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत बोलणी केलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)
गोंधळपाडा ता. अलिबाग	४/२ अ/२	५-१५-००	५१.५०

सदर वर नमूद बिनशेती मिळकत व त्यामधील असलेले ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी घर क्र. ६७१ अ क्षेत्र १७२५ चौ. फूट १६०.२९ चौ.मी. तळमजला, घर क्र. ६७१ ब क्षेत्र १७२५ चौ. फूट, १६०.२९ चौ.मी. पहिला मजला ही घर मिळकत अशी सर्व मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १३/०६/२०२३

सही/-
ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
पत्ता : शॉप नं. ४, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. विजय दिनकर लेले, २) श्री. विलास दिनकर लेले, ३) श्री. शरद दिनकर लेले सर्व रा. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवले असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु.पैसे)
नागाव ता. अलिबाग	१७२	०.१६.४०	१.१२

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावयात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १३/०६/२०२३

सही/-
ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
शॉप नं. ४, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. बळीराम दामू टोपले यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	एकूण क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
खानाव ता. अलिबाग	३७/२/ब/१	०-६९-१०	४.०४

वर नमूद जमीन मिळकतीपैकी विक्रेता श्री. बळीराम दामू टोपले यांचे मालकीचे ०-२९-१० हे.आर.क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदर मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेकी स्वरुपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०७/०६/२०२३

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरुमखाण, पो. वरसोली,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा क्र. ९९२२७०७०१२

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल रियाज अब्दुल कादिर गुलबार यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक मुबश्शीर गुलाम अली बुबेरे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे.साळोख तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू पै.)
१२५	१/ब	१-१०-००	३-५५

यापैकी मुबश्शीर गुलाम अली बुबेरे यांचे मालकीची व हिश्याची ०-२७-०० हे.आर. क्षेत्राची मिळकत विकत देणेचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबाकब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १४/०६/२०२३.

ॲड. नरेश रामदास आहीर
पत्ता-शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
मो.-९३२५०६००३७.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. स्वाती प्रविण पाटील रा. कामोठे, नवी मुंबई यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. तुकाराम शांताराम केंडे वगैरे-७ रा. गोयंडावाडी, वणी, ता. रोहा, जिल्हा-रायगड यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील मौजे

निवडक

मेस्सी पोलिसांच्या ताब्यात

बीजिंग : फुटबॉल सुपरस्टार लिओनेल मेस्सीला चीनच्या पोलिसांनी बीजिंग विमानतळावर ताब्यात घेतले आहे. मेस्सीला त्याच्या व्हिसामध्ये काही समस्या असल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, सुमारे ३० मिनिटांनंतर प्रकरण मिटले आणि मेस्सी बाहेर पडला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यावरुन सोशल मिडियावर चाहत्यांकडून जोरदार प्रतिक्रिया उमटत आहेत.

संजू सॅमनचे मदतकार्य

नवी दिल्ली : संजू सॅमनला आतापर्यंत भारतीय संघात म्हणावी तशी संधी मिळाली नाही.२०१५ मध्ये क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या संजूने आतापर्यंत केवळ १७ सामने खेळलेले आहेत.तरीही त्याचे चाहते मोठ्या प्रमाणात आहेत.संजूला आयपीएल फ्रेन्चाईशी १४ कोटी पगार देते तर बीसीसीआयकडून दरवर्षी १ कोटी दिले जातात. त्यातील २ कोटी तो स्थानिक खेळाडूंच्या मदतीसाठी खर्च करीत असतो.

अशोक राजपूत रुजू

पनवेल : नवी मुंबई परिमंडळ-२ च्या सहाय्यक आयुक्तपदी अशोक राजपूत यांनी पदभार स्वीकारला. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी पोलीस हे जनतेच्या न्यायासाठी नेहमीच तत्पर असतील, अशी भावना व्यक्त केली. अशोक राजपूत यांनी पनवेल तालुका पोलिस ठाण्यातील कार्यकाळ अत्यंत चोखंदळपणे सांभाळला होता. त्यानंतर त्यांची येथे नियुक्ती करण्यात आली.

महावितरणची मनमानी

श्रीवर्धन : श्रीवर्धन तालुक्यात महावितरणची मनमानी सुरूच असल्याचे पाहायला मिळत आहे. अरबी समुद्रातील चक्रीवादळ गुजरात व पाकिस्तानच्या दिशेने सरकत असताना, श्रीवर्धन तालुक्यात सोसाट्याचे वारे सुटत होते. अधून मधून पावसाच्या सरी देखील बरसत होत्या. पाभरे येथून श्रीवर्धनकडे येणाऱ्या मुख्य वीजवाहिनी मध्ये बिघाड झाल्यामुळे वीज पुरवठा सुरू होण्यासाठी रात्रीपर्यंत थांबावे लागले.

गावठी दारूचे साहित्य

आगरदांडा : पोलीस निरीक्षक-प्रकाश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळवट येथील जंगल परिसरात बेवारस गावठी दारुची हातभट्टी लावण्याचे रसायन आढळून आल्याने. पोलिसांनी ताबडतोब दारु बनविण्याचे कच्चे रसायन नष्ट केले. मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक नितीन मंडलिक, पोलीस नाईक - सुरेश वाघमारे, विक्रांत बांधणकर, सागर रसाळ, किरण कांबळे, मकरंद पाटील, अमित डफळ उपस्थित होते.

भारताचा विंडीज दौरा जाहीर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

विश्व कसोटी अजिंक्यपद सामना संपल्याने भारतीय संघ आता वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर जाणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने या दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विंडीज दौऱ्यावर दोन कसोटी, तीन वन डे आणि पाच टी२० सामने खेळणार आहे. विंडीज दौरा भारताच्या पुढील विश्व चषक अजिंक्यपद सायकलची सुरुवात देखील करेल. याबरोबरच एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेची तयारी करण्याची संधी मिळणार आहे.या मालिकेत नव्या युवा खेळाडूंना संधी दिली जाणार आहे.तर अनेक ज्येष्ठांना विश्रांती दिली जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

दोन कसोटी, तीन वन डेची मालिका

विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यांतर भारतीय संघाला जवळपास महिनाभराचा ब्रेक मिळाला आहे. १२ जुलैपासून भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला डॉमिनिका येथे सुरुवात होणार आहे. दुसरा कसोटी सामना २० जुलैपासून त्रिनिदादमध्ये खेळवला जाणार आहे. त्याच वेळी, २७ जुलैपासून तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू होणार आहे. पहिला आणि दुसरा वन डे (२९ जुलै) बार्बाडोसमध्ये खेळवला जाईल, तर तिसरा एकदिवसीय सामना १ ऑगस्टला त्रिनिदादमध्ये खेळवला जाईल. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पाच सामन्यांच्या टी२० मालिकेला ३ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. पहिला टी२० त्रिनिदादमध्ये, दुसरा टी२० ६ ऑगस्टला गयानामध्ये, तिसरा टी२० ८ ऑगस्टला गयानामध्ये, चौथा आणि पाचवा टी२० सामना अनुक्रमे १२ व १३ ऑगस्टला फ्लोरिडामध्ये खेळवला जाईल. म्हणजेच अमेरिकेतही दोन टी२० सामने खेळवले जातील. टी२० विश्वचषक म्हणजे २०२४ टी२० विश्वचषक फक्त वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत खेळवला जाणार आहे.

संघात मोठे बदल अपेक्षित आहेत

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी आणि टी२० मालिकेसाठी संघात अनेक बदल केले जाऊ शकतात, असे मानले जात आहे. पुढील आयसीसी अंतिम फेरी २०२५ मध्ये होणार आहे. अशा परिस्थितीत नवीन खेळाडू तयार करण्यासाठी हा सर्वोत्तम काळ मानला जातो. खराब कामगिरीमुळे चेतेश्वर पुजारा आणि उमेश यादव यांना संघातून वगळले जाऊ शकते. त्याचबरोबर त्यांच्या जागी यशस्वी जैस्वाल आणि मुकेश कुमार यांचा वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संघात समावेश केला जाऊ शकतो.

रिंकू सिंग-जितेश शर्मा यांना संधी

शिव सुंदर दास यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने पुढच्या पिढीतील खेळाडूंचा शोध सुरू केला आहे. टी२० मालिकेसाठी पूर्णपणे नवीन संघ पाठवला जाऊ शकतो. यामध्ये आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या काही खेळाडूंचाही समावेश होऊ शकतो. रिंकू सिंग आणि जितेश शर्मासारख्या खेळाडूंना टी२० संघात संधी मिळू शकते. याशिवाय ऋतुराज गायकवाड आणि यशस्वी जैस्वाल यांनाही टी२० संघात स्थान मिळू शकते. आयपीएलमध्ये प्रदीर्घ कालावधीनंतर पुनरागमन करणाऱ्या मोहित शर्मालाही टीम इंडियामध्ये स्थान मिळू शकते. मोहितने आयपीएलमध्ये शानदार गोलंदाजी केली. त्याचवेळी रोहित शर्मा, विराट कोहली यांना पुन्हा एकदा टी२० संघाबाहेर ठेवले जाऊ शकते, तर सिराज आणि शमी यांना कामाचा ताण आणि आगामी एकदिवसीय विश्वचषक पाहता टी२० मालिकेदरम्यान विश्रांती दिली जाऊ शकते.

इंटरकॉन्टिनेंटल फुटबॉल स्पर्धेत भारत अंतिमफेरीत

। भूवनेश्वर । वृत्तसंस्था।

भारतीय फुटबॉल संघाने सोमवारी इंटरकॉन्टिनेंटल कपमध्ये सलग दुसरा विजय मिळवला. भुवनेश्वर मधील कलिंगा स्टेडियममध्ये सुरू असलेल्या वनुआतू विरूद्धच्या सामन्यात १ - ० असा विजय मिळवला. या विजयाबरोबरच भारताचे अंतिम सामन्याचे तिकीट पक्के झाले.

भारताने संपूर्ण सामन्यावर आपले वर्चस्व गाजवले होते. मात्र रँकिंगमध्ये १६४ व्या स्थानावर असलेल्या वनाआतूने चांगला बचाव करत भारतीय स्ट्रायकर्सना रोखून धरले होते. मात्र अनुभवी सुनिल छेत्रीने शुभाशीष बोसच्या पासवर ८१ व्या मिनिटाला हा बचाव भेदत भारताचा पहिला गोल केला.

भारताने शुक्रवारी झालेल्या सामन्यात मंगोलियाचा २ - ० असा पराभव केला होता. भारताने दोन गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. भारतीय संघ गुरूवारी आपला अखेरचा राऊंड रॉबिन सामना खेळणार आहे. जागतिक क्रमवारीत १०१ व्या स्थानावर असलेल्या भारताने संपूर्ण सामन्यावर आपले वर्चस्व राखले.

सुनील छेत्री गुड न्यूज

जागतिक फुटबॉलमध्ये सध्या खेळत असलेल्या फुटबॉलपटूमध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय गोल करणाऱ्यांच्या यादीत सुनिल छेत्री तिसऱ्या स्थावावर आहे. वनुआतू विरूद्धच्या एकमेव गोलनंतर सेलिब्रेशन करताना छेत्रीने आपण बाप होणार असल्याची घोषणा केली. त्याने फुटबॉल आपल्या टीशर्टमध्ये ठेवला अन् आपल्या गर्भवती पत्नीला हा गोल समर्पित केला. यावेळी सुनिल छेत्रीची पत्नी सोनमने टाळ्या वाजवून सुनिलचा उत्साह वाढवला. सामन्यानंतर सुनिल छेत्रीने आपल्या या अनोख्या सेलिब्रेशनबद्दल माहिती दिली. तो म्हणाला की, ममाझी पत्नी गर्भवती आहे. तिची इच्छा होती की मी ही गुडन्यूज सर्वांशी शेअर करावी. आम्हाला सर्वांच्या शुभेच्छा हव्या आहेत.

● धार्मिकतेच्या नावाखाली राज्यात ठिकठिकाणी होत असलेल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पनवेल पोलिसांच्यावतीने लाँगमार्च काढून जनतेच जनजागृती करण्यात आली. (छायाचित्र - राजेश डांगळे)

शिंदे सरकार पाकला खेळू देणार का?

मुंबई : भारतात ऑक्टोबर महिन्यामध्ये एक दिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा होत आहे.या स्पर्धेच्या निमित्ताने पाकिस्तान भारतात येणार आहे.त्या संघाला महाराष्ट्रातील शिंदे सरकार अनुती देणार का यावरुन आता राजकीय वातावरण तापले आहे. १५ ऑक्टोबर रोजी भारत-पाकिस्तान सामना हा गुजरातमधील अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळला जाणार आहे. या मुद्द्यावरून राजकारण रंगण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून सत्तेत आलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या सामन्याबाबत काय भूमिका घेणार, हे पाहणंही महत्वाचं ठरणार आहे. याच कारण म्हणजे पाकिस्तानी संघाने भारतामध्ये खेळण्यास बाळासाहेब ठाकरे यांचा विरोध होता.तशी विरोधाची भूमिका शिंदे घेणार की नाही याबाबत उत्सुकता निर्माण झालेली आहे. तर आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे बीसीसीआयचे सचिव जय शाह हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे सुपुत्र आहेत, तर मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार हे खजिनदार आहे. या संबधामुळे सामन्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

पाच देशांचा अहवाल मागविला

। नवी दिल्ली। वृत्तसंस्था।

भारताच्या महिला कुस्तीपटूंनी भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरूद्ध लैंगिक शोषण केल्याचा आरोप करत दिल्ली पोलिसांकडे एफआयआर दाखल केली होती. दिल्ली पोलिसांना या प्रकरणी १५ जूनपर्यंत आरोपपत्र दाखल करायची आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा जोरदार तपास सुरू केला असून आता त्यांनी पाच देशांच्या कुस्ती महासंघाकडून मदत मागितली आहे. मात्र याचा वेळेत फायदा होईल अशी चिन्हे दिसत नाहीत.

ज्या महिला कुस्तीपटूंनी ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरूद्ध लैंगिक शोषणाचा आरोप केला आहे. त्यांनी आपल्या तक्रारीत कजाकिस्तान, बल्गेरिया, इंडोनेशिया, मंगोलिया आणि किग्रिस्तान येथे आयोजित केलेल्या स्पर्धांचा उल्लेख केला आहे. पुरावे गोळा करण्याच्या उद्येशाने दिल्ली पोलिसांनी या पाच देशांच्या कुस्ती महासंघांकडे लिखित स्वरूपात मदत मागितली आहे. या घटनेसंदर्भातील काही फोटो आणि व्हिडिओंची मागणी केली आहे.

महिला कुस्तीपटू लैंगिक शोषण

मात्र या प्रकरणात पेच निर्णाम झाला आहे. या ५ देशांच्या आंतरराष्ट्रीय कुस्ती संघटनांपैकी कोणीही १५ जूनपूर्वी माहिती देऊ शकत नाही. दिल्ली पोलिसांकडे आपला तपास अहवाल सादर करण्यासाठी फक्त १५ जून पर्यंतचाच वेळ आहे. १५ जूननंतर या देशांकडून मिळालेली माहिती पुरवणी आरोप पत्रात सामील केली जाऊ शकते.

महासंघाची ४ जुलैला निवडणूक होणार

भारतीय ऑलिम्पिक संघाने भारतीय कुस्ती महासंघाची निवडणूक ही ४ जुलैला घेण्याची योजना तयार केली आहे. यासाठी जम्मू काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश महेश मित्तल कुमार यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी सात जूनला आंदोलन करणाऱ्या कुस्तीपटूंशी चर्चा केली होती. त्यावेळी निवडणूक ३० जूनला घेण्यात यावी अशी मागणी झाली होती. मात्र इतक्या लवकर निवडणूक घेणे शक्य होणार नव्हते कारण विशेष बैठकीसाठी २१ दिवसांची नोटीस देणे गरजेचे होते.

संवर्धन मोहिमेतून सुरगड घेतोय मोकळा श्वास

किल्ल्यावर सापडले तोफगोळे

। गोवे-कोलाड । वार्ताहर।

स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेच्या मार्फत सूरगडावर या वर्षीची २१ वी सलग मोहीम राबवण्यात आली.. गेल्या वर्षभरात सलग संवर्धन मोहिमा राबवून संस्थेच्या मावळ्यांनी सूरगडाला नवे रुप बहाल करण्यात मोलाची भूमीका बजावत गड संवर्धन व त्यांचे संरक्षण करत असताना पुन्हा स्थानिक सुरगड संस्थेच्या मावळ्यांना शिवकालीन तोफ गोळे सापडले असल्याने संवर्धन करत असलेल्या मावळ्यांच्या मनात नवे चैतन्य निर्माण झाले आहे.

छत्रपती शिवरायांचा इतिहास जपताना स्वराज्याच्या गडकोटांची भूमिका खुपच महत्त्वाची ठरते याच अनुषंगाने आपला तिहासिक वारसा जपण्यास कठीबद्ध राहून स्थानिकसुरगडसंस्थेच्यामाध्यमातूनरविवारी संवर्धन मोहीम आयोजित करण्यात आली. सदर मोहिमेत गडावरील पाण्याचे टाके साफ करण्यात आले.. चिखल मातीने भरलेले पाण्याचे टाके स्वच्छ करताना मावळ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. एकाच मोहिमेत गाळ काढून टाके पूर्णतः स्वच्छ करण्यात आले.तसेच ही मोहीम राबवित असताना येथील परिसरात या मावळ्यांना आदी तोफा सापडल्या आहेत त्याच बरोबर पुन्हा तोफ गोळे सापडले आहेत . या मोहिमेसाठी गड रहाळ परिसरातून अनेक मावळे उपस्थि होते.. अभिमानाची बाब म्हणजे टाके गाळ मुक्त करत असताना या गाळात अनेक तोफ गोळे सापडले व स्वराज्याचा हा अनमोल ठेवा मातीमोल होता होता वाचला. मागील काही संवर्धन मोहीमांत टाक्यांमधून तोफांचे गोळे तसेच तोफा सापडल्या तसेच अनेक अवशेष नामशेष होता होता संवर्धीत झाले.

> शिवकालीन गडांचे संवर्धन आणि संरक्षण करणे गरजेचे आहे गडकोट किल्ले ही खरी इतिहास कालीन संपत्ती आहे गड रहाळ परिसरातून अधिक स्वच्छ करणे गरजेचे आहे याकरिता अजूनही मावळ्यांची गरज संवर्धनासाठी आहे.
> अजय भोसले
> संस्थेचे संस्थापक

मॅक्स महाराष्ट्र आणि महापरिवर्तनवादी पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ठ छायाचित्रकार पुरस्कार मा. छत्रपती युवराज संभाजी राजे, खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते स्वीकारताना छायाचित्रकार समीर मालोदे.समिता मालोदे. यावेळी आनंद आंबेडकर, राजरत्न आंबेडकर, आमदार अदिती तटकरे, रविंद्र आंबेकर सर आणि धम्मशील सावंत उपस्थित होते

व्यावसायिकांवर बेकारीची कुऱ्हाड

बैलगाडी होत चालली नामशेष

। चिरनेर । दत्तात्रय म्हात्रे ।

बदलत्या काळात दळणवळणाच्या साधनांमध्ये उरण तालुक्यात बैलगाडी कालबाह्य होत चालली असून, ती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. ज्यांचा हा बैलगाडी बनविण्याचा व्यवसाय आहे त्या घटकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली असल्याचे दिसत आहे. चिरनेरचे बैलगाडीच्या पारंपारिक व्यावसायातील बैलगाडी मालक रघुनाथ चिंतामण नारंगीकर यांच्याशी याबाबत संवाद साधला असता, त्यांनी चिरनेर पूर्व विभागात आता मोठ्या प्रमाणात कंटेनर यार्ड उभे राहत असून, येथील वाल, चवळी कडधान्य पिकणारीआणि भाताचे मुख्य पीक देणारी सोन्यासारखी शेतजमीन आता मातीच्या भरावाखाली आली आहे. त्यामुळे कसदार जमीनच संपुष्टात आल्याने शेतकरीही नामशेष होऊ लागला असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. कालांतराने दळणवळणातील आधुनिक साधनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊ लागली.

दळणवळणातील जलद आणि वेगवान अशा अत्याधुनिक वाहनांचा काळानुसार सर्वत्र सर्रास वापर होऊ लागला आहे. त्यामुळे बैलांच्या सहाय्याने ओढले जाणारे दोन चाकांचे बैलगाडीचे वाहन या अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनातून मागे पडले आहे. चिरनेर पूर्व विभागात सध्या जे काही भात शेतीच्या लागवडीखालील क्षेत्र शिल्लक राहिले आहे. या शेतीत देखील शेतकरी शेतीची नांगरणी करण्यासाठी पॉवर टिलरचा वापर करत आहेत. त्यामुळे आमचे चार दोन बैलांचे नांगर आहेत. या नांगराची मागणी देखील थांबली असल्याचे त्यांनी सांगितले.

दळवळणात पिछेहाट

गावात रिक्षा, टेम्पो या वाहनांच्या प्रमाणात वाढ झाली असल्यामुळे, या जलद आणि वेगवान वाहनांना लोक अधिक पसंती देत आहेत. त्यामुळे दळणवळणातील बैलगाडीचे वाहन मागे पडले आहे. बैलगाडीला भाडेच राहिले नसल्यामुळे येथील बहुतांशी पिढीजात बैलगाडी व्यावसियिकांनीआपला पारंपारिक बैलगाडीचा व्यवसाय बंद केला आहे. त्यामुळे आम्हा बैलगाडी व्यावसियिकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली असल्याचे त्यांनी सुचित केले.

> बदलत्या काळात आमच्या बैलगाडीच्या वाहनाला अजिबात भाडे राहिले नाही. त्यामुळे आमच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे .मात्र यापूर्वीच्या आमच्या घराण्यातील कुटुंबियांचे उपजिविकेचे बैलगाडी हे प्रमुख साधन होते. या बैलांच्या जीवावर आमच्या संसाराचा गाडा ओढला जात होता. याची जाण ठेवून, माझे बैलावरचे प्रेम काही कमी होत नाही. म्हणून मला जेवढे दिवस या बैलांचा सांभाळ करता येईल, तोपर्यंत मी बैलांना सांभाळून, त्यांची निगा राखणार आहे.
> रघुनाथ नारंगीकर चिरनेर)
> (बैलगाडी व्यावसायिक)

पहिल्याच पावसाने मुरुड आगार राडेराड

। आगरदांडा । वार्ताहर ।

मुरुडमध्ये पहिल्याच पावसाने दैनाउडविलीआहे.याचामोठाफटका एसटी आगाराला बसला आहे. आगाराच्या प्रवेशव्दाराजवळचा परिसर चिखलमय झाला आहे. या चिखलातून प्रवाशांना काढवा लागतो. मुरुड पर्यटन क्षेत्र असल्याने दररोज शेकडो पर्यटक एसटीमधून ये-जा करीत असतात.तरीही एसटी डेपोतील सुधारणा होत नसल्याचे प्रकर्षाने जाणवते.

मुरुड शहराचा कायापालट झाला तरी एसटी डेपो सुधारणा होत नाही. जिल्ह्यातील नंबर एकचा एसटी डेपो आता शेवटच्या नंबरवर आला आहे. डेपोमधील चांगला रस्ता,प्रवासीशेड, शौचालय असे अनेक सोयी प्रवाशांना देण्यापासून डेपो वंचित राहिला आहे. डेपोमधील सिमेंट कॉक्रिटकरण गेले अनेक वर्षांपासून अर्धवट सिस्थित आहे. दर पावसाळ्यात मोठे खड्डे पडतात, प्रवाशांना या खड्ड्यातून एसटी पर्यंत चालावं लागतं. कधी कधी चालणे कठीण होतं. आता पुन्हा एसटी डेपोच्या प्रवेशव्दारा जवळच पहिल्या पावसाच्या सरीत खड्डे पडयाला सुरवात झाली आहे. रस्ताची निविदा मंजुर झाली तरी एसटी डेपो चा रस्ता का बनत नाही असं सवाल प्रवासी विचारात आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)